दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २३७ I बुधवार १० जून २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



**‘सहजयोग’**

**भाग ७६**

### आत्मसाक्षात्कार

जेव्हा आपल्याला हे समजेल की आपल्यामध्ये आत्मा आहे, तेव्हाच आपण परमात्म्याला ओळखू शकाल. आत्म्याला जाणल्याशिवाय आपण परमात्म्याला कधीही ओळखू शकत नाही. जोपर्यंत तुमचे डोळे उघडत नाहीत, जोपर्यंत तुमचा आत्मा हे पाहू शकत नाही, तोपर्यंत तुम्ही परमात्म्याला प्राप्त करू शकत नाही. म्हणून, सर्वात पहिले काम म्हणजे 'आत्मसाक्षात्कार' मिळवणे. त्याची संपूर्ण व्यवस्था परमात्म्याने आपल्या आत आधीच करून ठेवली आहे, त्यासाठी आपल्याला वेगळे कष्ट करण्याची मुळीच गरज नाही.शेवटी, आपण जो हा श्वास घेत आहोत त्यासाठी आपल्याला काही मेहनत करावी लागते का? किंवा आपले हृदय जे दर मिनिटाला धडधडत आहे आणि प्रत्येक प्रकारे आपल्याला मदत करत आहे, त्यासाठी आपल्याला काही कष्ट करावे लागतात का? जर परमात्म्याला प्राप्त करणे आणि आत्मदर्शन होणे मनुष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे, तर ते सहजपणे व्हायलाच हवे आणि ते होणारच, त्याला सहजच व्हावे लागेल.पण आजकालची जनता आणि आजकालचे तरुण, त्यांचा तर आता परमात्म्यावरून विश्वासच उडाला आहे; परंतु त्याचे कारण असे आहे की, ज्या प्रकारे अंध लोकांनी अंधपणे परमात्म्याला जाणून घेण्याचा प्रयत्न केला, तो पाहून हे लोक (तरुण) विचार करतात कारण ते बुद्धिवादी आहेत. ते पाहतात की कशा प्रकारे परमात्मा आणि आत्मा वगैरे काही नाहीये, ही तर निव्वळ फसवणूक आहे; हे तर केवळ फालतू लोकांचे खिसे भरण्याचे साधन आहे. असे अनेक लोक आहेत जे काही कामधंदा करत नाहीत, त्यांच्यासाठी हा पैसा कमावण्याचा एक चांगला बहाणा आणि एक व्यवसाय बनला आहे. बुद्धीने परमात्मा ओळखता येणार नाही. १६/०१/१९७९ बोरिवली अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# कोकणात दमदार पाऊस

## मान्सून आता मुंबईकडे सरकला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोकण :** कोकणातील अनेक भागात पावसाने चांगली सुरुवात करत दमदार सलामी दिली. रत्नागिरी शहरासह जिल्ह्यातल्या अनेक भागात काल दुपारनंतर सुरू झालेला पाऊस चांगलाच बरसतोय.

१० हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी, तर कधी जोरदार बॅटिंग असं स्वरूप पावसाचं आहे. त्यामुळे शेतकरी वर्गासह जिल्हावासीयांमध्ये समाधान आहे. उकड्यापासून देखील नागरिकांना दिलासा मिळालाय. हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी, तर कधी जोरदार बॅटिंग असं स्वरूप



पावसाचं आहे. त्यामुळे शेतकरी वर्गासह जिल्हावासीयांमध्ये समाधान आहे. उकड्यापासून देखील नागरिकांना दिलासा मिळालाय. काल मृग नक्षत्राची सुरुवात झाली आणि त्याच दिवसापासून पावसानं हजेरी लावली. त्यामुळे शेतकरी देखील आता शेतीच्या कामाना सुरुवात करेल. कोकणानंतर आता मान्सून मुंबईच्या दिशने सरकरला आहे. आज मुंबईत पाऊस बरसण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात आज (९ जून) वादळी वाऱ्यासह मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज (पान ४ वर)

## राष्ट्रवादीचे राजेंद्र जैन राज्यसभेवर बिनविरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यसभेच्या एका जागेसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या राजेंद्र जैन यांची बिनविरोध निवड जवळपास निश्चित झाली आहे. महायुतीकडून राजेंद्र जैन यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला आहे.

राज्यसभेच्या एका जागेसाठी येत्या १८ जून रोजी मतदान होत आहे. या पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या सोमवारी शेवटच्या दिवशी जैन यांच्यासह आणखी एका हौशी उमेदवाराने अर्ज भरला आहे. परंतु, या अर्जावर अनुमोदक आणि सूचक यांच्या सह्या नसल्याने (पान ४ वर)



### महाविकास आघाडी कडून अर्ज नाही

अर्ज दाखल करताना सुनील तटकरे यांच्यासह पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, खासदार प्रफुल पटेल, मंत्री छगन भुजबळ, मंत्री आशिष शेलार, मंत्री श्री. भरत गोगावले, ज्येष्ठ नेते व माजी मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील, खासदार श्री. पार्थ पवार यांसह अन्य मान्यवर नेते व पदाधिकारी देखील उपस्थित होते.

## ऑपरेशन ब्लु स्टारचा निषेध करणाऱ्या मंत्री महाजनांची हकालपट्टी करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : भाजप नेते व महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री गिरीष महाजन यांनी अमृतसर येथे ऑपरेशन ब्ल्यू स्टार संदर्भात केलेले वक्तव्य अत्यंत बेजबाबदार, राष्ट्रहिताला बाधा आणणारे आणि भारतीय सैन्यदलाच्या शौर्याचा अवमान करणारे आहे. देशाच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून त्यांनी दहशतवादाविरोधातील भारताच्या लढ्यालाच कमी लेखण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे देशविरोधी भूमिका घेणाऱ्या गिरीष महाजन यांची तात्काळ मंत्रिमंडळातून व भाजप पक्षातून हकालपट्टी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

### हर्षवर्धन सपकाळ : देशाची आणि सैन्यदलाची माफी मागावी



ऑपरेशन ब्ल्यू स्टारच्या ४२ व्य स्मृतिदिनानिमित्त अमृतसर दंडमी टंकसालच्या मुख्यालयात शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात बोलताना महाजन यांनी दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी निर्णय घेतलेल्या ऑपरेशन ब्लु स्टार कारवाईचा निषेध केला होता. त्यांच्या या वक्तव्याचा काँग्रेसमधून संताप व्यक्त होत आहे. ही कोणत्याही धर्माविरोधातील कारवाई नव्हती, तर भारताचे तुकडे करण्याचे कारस्थान रचणाऱ्या सशस्त्र खलिस्तानी दहशतवाद्यांविरोधात भारतीय सैन्यदलाने राबविलेली अत्यंत कठीण आणि आवश्यक मोहीम होती. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो याची पूर्ण जाणीव असतानाही देशाच्या एकता व अखंडतेला प्राधान्य देत हा कठोर निर्णय घेतला होता. त्यानंतर खलिस्तानी अतिरेक्यांनी त्यांची हत्या केली. या मोहिमेचे नेतृत्व करणारे महाराष्ट्राचे सुपुत्र जनरल अरुणकुमार वैद्य यांनाही दहशतवाद्यांनी लक्ष्य करून त्यांची हत्या केली. देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वांच्या त्यागाचा अवमान करण्याचे काम गिरीष महाजन करत आहेत असा संताप सपकाळ यांनी व्यक्त केला

मंत्री गिरीश महाजन यांच्या विधानाने भारतीय जनता पक्ष व रा. स्व. संघाची राष्ट्रविघातक प्रवृत्ती समोर आली आहे. इंदिरा गांधी यांनी ऑपरेशन ब्लू स्टार राबविले नसते तर देशाचे तुकडे पडले असते, देशाच्या अखंडतेसाठी इंदिराजी (पान ४ वर)

## बँक ऑफ महाराष्ट्र वाकोडी फाटा शाखेविरोधात

### आरबीआय लोकपालांकडे तक्रार : चौकशीची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेच्या कामकाजाबाबत काही आक्षेप नोंदवत ग्राहक गणेश इंगळे यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) एकात्मिक लोकपाल योजनेअंतर्गत तक्रार दाखल केली आहे., मृत खातेदाराच्या दाव्याच्या निपटाऱ्यात झालेला कथित विलंब, माहिती उपलब्ध करून देण्याबाबतची भूमिका तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेदरम्यान कथित शुल्क आकारणीच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.






तक्रारदार गणेश इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत खातेदाराच्या वारसदाराच्या नात्याने आवश्यक कागदपत्रे एप्रिल २०२६ मध्ये शाखेत सादर करण्यात आली होती. संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर दावा निकाली निघण्याबाबत शाखेकडून सकारात्मक माहिती देण्यात न आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तथापि, उर्वरित प्रक्रिया पूर्ण होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागल्याचा दावा त्यांनी केला आहे.

याशिवाय, शाखेशी संलग्न असलेल्या बिझनेस करस्पॉंडंट (बीसी) मार्फत खाते उघडण्याच्या प्रक्रियेत काही ग्राहकांकडून रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा केला आहे. (पान ४ वर)

## भाजप विरोधामुळे छगन भुजबळांची राज्यसभा हुकली..?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (अ प) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरिक पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यसभेवर जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र पक्षाने भंडारा-गोंदिया मतदारसंघातून राजेंद्र जैन यांना उमेदवारी देऊन भुजबळ यांच्या आशांवर पाणी फेरले आहे. भाजपचा विरोध असल्यानेच भुजबळ यांना राज्यसभेची उमेदवारी दिली गेली नाही अशा चर्चा आता रंगल्या आहेत.



भुजबळ यांचे समर्थक आणि पक्षातील ज्येष्ठ कार्यकर्ते भुजबळ यांना संधी नाकारण्यात आल्याने सध्या नाराज असल्याचे चित्र आहे. दरम्यान, समीर भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना पडद्यामागील काही घडामोडी सांगितल्या आहेत. ‘राज्यसभेवर (पान ४ वर)

## मुलीवर बळजबरीने उचलून नेऊन अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** एकाच ठिकाणी कामाला असताना हाताखालच्या अल्पवयीन मुलीस बळजबरीने मोटारसायकलवर उचलून नेऊन तिच्यावर बळजबरीने तिच्यावर शारीरिक संबंध करण्याचा धक्कादायक प्रकार श्रीरामपूर शहरामध्ये घडला असून, त्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### श्रीरामपूरात धक्कादायक प्रकार; गुन्हा दाखल

मिळालेल्या माहितीनुसार नोव्हेंबर २०२३ मध्ये आरोपी सुजित लोहकरे (रा.उंबरगाव, ता.श्रीरामपूर) हा श्रीरामपुरात एका मार्केटींग कंपनीत नोकरीला करीत होता.याच कंपनीत त्याच्या हाताखाली एक अल्पवयीन मुलगी काम करित होती.कामाच्या निमित्ताने लोहकरे याने तिच्याशी जवळीक

साधून त्यानंतर तिच्या अल्पवयीनपणाचा गैरफायदा घेत ती राहात असलेल्या एका कॉलनीमध्ये असणाऱ्या तिच्या घराजवळून तिला मोटारसायकलवर बळजबरी बसवले.तसेच तिला टिळकनगर कारखान्याकडे जाणाऱ्या रोडने नेऊन रस्त्यालगत असलेल्या ओढ्याजवळ तिला नेले,व तिथेच शेतात या मुलीच्या अल्पवयीनपणाचा फायदा घेत तिला लग्नाचे अमिष दाखवून तिच्याशी बळजबरीने संबंध प्रस्तापित केले.

त्याने याबाबत कोणाला काही सांगितले तर,तुझ्या घरच्यांना जिवे ठार मारुन टाकील अशी धमकी देत वारंवार या मुलीशी शारिरीक संबंध ठेवले होते. याबाबत त्यामुळे मुलीनेही कोणाही काही सांगितले नाहीत. त्यानंतर २०२५ मध्ये सदर मुलगी ही गरोदर असल्याचे खोटे सांगून तिला लग्न करण्यास भाग पाडले.(दि.१) मार्च २०२५ रोजी सुजित भास्कर लोहकरे याने तिच्याबरोबर कारेगाव (ता.श्रीरामपूर ) येथे लग्न झाले.

तिच्या सोबत डिसेंबर २०२५ पर्यंत सासरी नांदत असताना ती अल्पवयीन आहेत.असे माहिती असताना आरोपीने तिच्यासोबत बळजबरीने शारीरिक संबंध ठेवले व तिला शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहेत. (पान ४ वर)

### महत्त्वाचे..

**मंत्रालयीन उपविभागांचे स्वतंत्र विभाग; विभागांची संख्या ४५ होणार**

मुंबई : प्रशासकीय काम काजात गतिमानता आणि सुसूत्रता येण्यासाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. यामुळे सध्या अस्तित्वात असणाऱ्या ३३ प्रशासकीय विभागांची संख्या ४५ होणार असली तरी या विभागांसाठी स्वतंत्र मंत्रिपद किंवा स्वतंत्र कर्मचारी वर्ग नियुक्त होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ईज ऑफ डुईंग बिझनेस आणि ईज ऑफ लिव्हिंग संकल्पनेवर भर देण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार मंत्रालयीन विभागात सुसूत्रता आणण्यासाठी पुनर्रचना करण्यात आली. यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगवान होईल, योजनांची अंमलबजावणी आणि क्षेत्रीय यंत्रणांशी प्रभावी समन्वय साधणे शक्य होणार आहे.सध्या मंत्रालयात ३३ प्रशासकीय विभाग होते. यामुळे विभागांचे सुसूत्रीकरण करुन कार्यक्षमता सुधारण्यासाठी विभागांच्या विषयांच्या कार्यासनासह पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला. नवीन विभागांकरिता स्वतंत्र आस्थापना, रोख शाखा आणि नोंदणी शाखा यासाठी स्वतंत्र व्यवस्था असेल.

## जनगणनेत अहिल्यानगर मनपा राज्यात द्वितीय

### अवघ्या २०-२१ दिवसांत शत-प्रतिशत उद्दिष्ट पूर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात आलेल्या जनगणना अभियानात अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली. तब्बल ३० दिवसांसाठी नियोजित असलेले जनगणनेचे शत-प्रतिशत कार्य केवळ २० ते २१ दिवसांत पूर्ण करून महानगरपालिकेने कार्यक्षमता, नियोजन आणि संघभावनेचा आदर्श निर्माण केला.

सुमारे ६९२ प्रगणक व तेवढ्याच घर याद्या आणि सुमारे १२५ पर्यवेक्षकांच्या डिजिटल जनगणनेला प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, जनगणना कक्ष प्रमुख राकेश कोतकर, सर्व प्रभाग (पान ४ वर)

### भंडाऱ्याची सेवा केली अन् काळाने घातला घाला

## भालगावात शेतकरी व विद्यार्थ्याचा नदीत बुडून मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** जुने भालगाव येथील महादेव मंदिरातील भंडाऱ्याच्या तयारीत उत्साहाने सहभाग घेतल्यानंतर काही तासांतच एका शेतकऱ्यासह दहावीच्या विद्यार्थ्यावर काळाने झडप घातल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी घडली. नदीत बुडून भास्कर देवराव तनपुरे (वय ५०) आणि सार्थक गणेश निमसे (वय १६) यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने भालगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

सोमवार हा महादेव मंदिरातील कीर्तन व भंडाऱ्याचा दिवस असल्याने गावात धार्मिक वातावरण होते. भास्कर तनपुरे आणि सार्थक निमसे यांनीही भंडाऱ्याच्या तयारीत व स्वयंपाकाच्या कामात मनापासून सहभाग घेतला होता. दुपारी सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास दोघे नदीत पोहण्यासाठी गेले. त्यानंतर ते घरी



परतले नाहीत. मात्र कीर्तनाच्या कार्यक्रमात व्यस्त असावेत, असा समज झाल्याने त्यांच्या अनुपस्थितीकडे तातडीने लक्ष गेले नाही.

मंगळवारी सकाळी नदीकाठी मासेमारीसाठी गेलेल्या युवकांना काठावर कपडे दिसून आल्याने संशय आला. शोध घेतला असता नदीपात्रात दोघांचेही मृतदेह तरंगताना आढळून आले. ही बातमी गावात पोहोचताच हळहळ व्यक्त करण्यात आली.

भास्कर तनपुरे हे कष्टाळू शेतकरी म्हणून परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व दोन मुली असा परिवार आहे. तर सार्थक निमसे हा कुटुंबातील एकुलता एक मुलगा होता. नुकतीच दहावीची परीक्षा पूर्ण करून भविष्याची स्वप्ने पाहणाऱ्या सार्थकच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. घटनेची माहिती मिळताच शिवशंभो ॲम्बुलन्स सेवेमार्फत दोन्ही मृतदेह नेवासा ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. धार्मिक सेवेत रमलेल्या दोन जीवांचा एका क्षणात झालेला अंत भालगावकरांच्या मनाला चटका लावून गेला असून संपूर्ण गावावर दुःखाचे सावट पसरले आहे.

# निसर्गाने झोडपले, आरटीओने लुटले!


## मढेवडगाव येथे डाळिंब उत्पादक शेतकऱ्याला २४ हजारांचा दंड; ‘तडजोड’ फसल्याची चर्चा

दादा सोनवणे : राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** एका बाजूला निसर्गाचा तडाखा दुसऱ्या बाजूला प्रशासनाचा फटका अशा दुहेरी संकटात श्रीगोंदा तालुक्यातील डाळिंब उत्पादक शेतकरी सापडल्याचे चित्र समोर आले आहे. दोन दिवसांपूर्वी हंगेवाडी परिसरात झालेल्या वादळी पावसामुळे डाळिंब बागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. झाडांवरून गळून पडलेली डाळिंबे खराब होण्यापूर्वी बाजारात विक्रीसाठी नेत असताना एका शेतकऱ्यावर आरटीओ विभागाने तब्बल २४ हजार रुपयांचा दंड ठोठावल्याने संतापाची लाट उसळली आहे.









अहमदनगर-दौंड महामार्गावरील मढेवडगाव येथे आरटीओ पथकाने डाळिंब वाहून नेणारे पिकअप वाहन अडवून कारवाई केली. संबंधित शेतकऱ्याने वादळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती देत विनंती केली; मात्र अधिकाऱ्यांनी कोणतीही सहानुभूती न दाखवता विविध कलमांखाली ऑनलाईन दंड आकारल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, वाहनचालक आणि अधिकाऱ्यांमध्ये ‘तडजोड’ होऊ न शकल्यानेच ही कारवाई करण्यात आल्याची चर्चा तालुकाभर रंगू लागली आहे. तडजोड झाली असती तर दंड झाला नसता का? असा सवाल आता शेतकरी आणि वाहतूकदार उघडपणे विचारू लागले आहेत. गावकऱ्यांमध्ये तर, वादळाने पिकं घातली आणि आरटीओने उरलेसुरलेही काढून घेतले, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

वादळामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा असताना, अशा प्रकारच्या कारवायांमुळे प्रशासनाविषयी रोष वाढताना दिसत आहे. नियमांची अंमलबजावणी आवश्यक असली तरी आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांशी मानवी दृष्टिकोनातून वागण्याची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.नियम फक्त वसुलीसाठीच आठवतात का? असा थेट सवाल उपस्थित करत हंगेवाडी व परिसरातील शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून वरिष्ठांनी तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. शेतकरी आधीच हवामानाच्या लहरीपणाने होरपळला आहे; आता प्रशासनाने तरी जखमेवर मीठ चोळू नये, अशी भावना व्यक्त होत आहे.

# श्रद्धेच्या नावाखाली आरोग्याशी खेळ थांबायलाच हवा

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

महाराष्ट्राच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनात शिर्डीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. दरवर्षी लाखो भाविक साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येतात. श्रद्धा, विश्वास आणि भक्तिभावाने ते येथे नतमस्तक होतात. साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यासाठी आणि प्रसाद म्हणून घरी नेण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर पेढे व इतर खाद्यपदार्थ खरेदी करतात. मात्र याच श्रद्धेचा गैरफायदा घेत भाविकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. मंदिर परिसरातील अनेक प्रसाद दुकानांमध्ये निकृष्ट दर्जाचे, भेसळयुक्त आणि अगदी बुरशी लागलेले पेढे विकले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आल्याने केवळ शिर्डीच नव्हे तर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे.

प्रसाद हा केवळ खाद्यपदार्थ नसतो; तो श्रद्धेचे प्रतीक असतो. देवस्थानातून मिळणाऱ्या प्रसादाकडे भाविक पवित्रतेच्या भावनेने पाहतात. त्यामुळे प्रसादाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होणे हे गंभीर स्वरूपाचे नैतिक आणि सामाजिक अपराध मानले पाहिजे. दुर्दैवाने शिर्डीत अनेक वर्षांपासून प्रसादाच्या नावाखाली काय विकले जात आहे, त्याची निर्मिती कुठे होते, त्यामध्ये कोणते घटक वापरले जातात, त्याची मुदत किती आहे याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती ग्राहकांना दिली जात नसल्याचे समोर आले आहे. पॅकेजिंगवर उत्पादकाचे नाव, उत्पादन दिनांक, एक्सपायरी डेट यांसारख्या मूलभूत गोष्टींचाही अभाव असल्याचे आढळून आले आहे. हे केवळ ग्राहक संरक्षण कायद्याचे उल्लंघन नसून अन्नसुरक्षा नियमांचाही भंग आहे.

विशेषतः बुरशी लागलेल्या पेढ्यांच्या तक्रारी समोर आल्याने हा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. अन्नपदार्थांमध्ये बुरशी निर्माण होणे म्हणजे ते आरोग्यासाठी घातक झाल्याचे स्पष्ट लक्षण असते. अशा पदार्थांच्या सेवनामुळे अन्नविषबाधा, पचनसंस्थेचे विकार, संसर्गजन्य आजार आणि गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. लाखो भाविकांपैकी लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्तींचा मोठा सहभाग असतो. अशा परिस्थितीत निकृष्ट दर्जाचा प्रसाद विकणे म्हणजे त्यांच्या आरोग्याला थेट धोका निर्माण करणे होय.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे संबंधित यंत्रणांचे दीर्घकाळ चाललेले दुर्लक्ष. शिर्डीसारख्या जागतिक स्तरावर प्रसिद्ध धार्मिक स्थळी दररोज हजारो लोक येत असताना तेथील खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेवर नियमित नियंत्रण असणे अपेक्षित होते. स्थानिक स्वराज्य संस्था, अन्न व औषध प्रशासन, तसेच संबंधित इतर यंत्रणांनी वेळोवेळी तपासण्या करून नियमांची अंमलबजावणी केली असती तर अशी परिस्थिती उद्भवली नसती. अनेक वर्षे दगडासारखे कडक पेढे विकले जात असल्याच्या तक्रारी होत्या, तरीही त्याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. ही बाब प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

सुदैवाने, भाविकांच्या तक्रारीनंतर अन्न व औषध प्रशासनाने तातडीने कारवाई सुरू केली आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर भेसळखोरांविरोधात राज्यव्यापी मोहीम हाती घेतली आहे. शिर्डीतील प्रकरण समोर येताच प्रशासनाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि प्रसाद दुकानांवर छापेमारी सुरू झाली. पेढ्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येत आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ही कारवाई स्वागतार्ह असली तरी ती केवळ तात्पुरती मोहीम ठरू नये. दीर्घकालीन आणि परिणामकारक उपाययोजना राबविणे अत्यावश्यक आहे. यासाठी सर्वप्रथम प्रसाद विक्री व्यवसायाचे संपूर्ण नियमन आवश्यक आहे. मंदिर परिसरातील प्रत्येक प्रसाद विक्रेत्याकडे वैध परवाना असणे बंधनकारक केले पाहिजे. विकल्या जाणाऱ्या प्रत्येक खाद्यपदार्थावर उत्पादकाचे नाव, उत्पादन दिनांक, मुदत समाप्ती दिनांक, घटकांची माहिती आणि अन्नसुरक्षा मानकांचे पालन झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता त्यांचे परवाने रद्द करण्याची कठोर भूमिका घेणे गरजेचे आहे.

तसेच शिर्डीसारख्या प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये नियमित आणि अचानक तपासण्या होणे आवश्यक आहे. प्रयोगशाळा चाचण्यांची वारंवारता वाढविणे, ग्राहक तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करणे आणि जनजागृती मोहिमा राबविणे यालाही तितकेच महत्त्व आहे. भाविकांनीही प्रसाद खरेदी करताना पॅकेजिंग, दर्जा आणि वैध माहिती तपासण्याची सवय लावली पाहिजे. श्रद्धा आणि जागरूकता यांचा समतोल राखणे ही आजची गरज आहे.

साईबाबांनी आपल्या शिकवणीत सत्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांना सर्वोच्च स्थान दिले. त्यांच्या नावावर चालणाऱ्या व्यापारात जर फसवणूक, भेसळ आणि नफेखोरीला स्थान मिळत असेल तर ते साईबाबांच्या विचारांनाच हरताळ फासणारे आहे. धार्मिक स्थळे ही श्रद्धेची केंद्रे असली तरी तेथे ग्राहकांचे हक्क आणि सार्वजनिक आरोग्य यांच्याशी कोणतीही तडजोड होऊ शकत नाही. भाविकांचा विश्वास हीच सर्वात मोठी संपत्ती आहे आणि त्याचे संरक्षण करणे ही प्रशासन, व्यापारी आणि समाज या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. शिर्डीतील पेढा प्रसाद प्रकरण हे केवळ एका शहरापुरते मर्यादित नाही.

राज्यातील आणि देशातील अनेक धार्मिक स्थळांवरील प्रसाद व खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत व्यापक तपासणीची गरज या घटनेने अधोरेखित केली आहे. आज शिर्डीत सुरू झालेली कारवाई उद्या संपूर्ण राज्यातील तीर्थक्षेत्रांसाठी आदर्श ठरली पाहिजे. श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेला हा आरोग्याशी खेळ कायमचा थांबविण्यासाठी कठोर, पारदर्शक आणि सातत्यपूर्ण कारवाई हाच एकमेव मार्ग आहे. भाविकांच्या श्रद्धेचा मान राखत त्यांच्या आरोग्याचे संरक्षण करणे हेच खऱ्या अर्थाने साईसेवा ठरेल.

# अहिल्यादेवी घाटाच्या सर्वांगीण विकासाला गती

## कार्यकारी अभियंत्यांच्या पथकाकडून पाहणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** येथील ऐतिहासिक अहिल्यादेवी घाटाच्या सर्वांगीण विकासासाठी जलसंपदा विभागाच्या नाशिक येथील कार्यकारी अभियंत्यांच्या पथकाने काल सविस्तर पाहणी केली. राज्याचे जलसंपदा मंत्री मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी अलीकडेच अहिल्यादेवी घाटावर स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. मात्र, केवळ स्मारक नव्हे तर संपूर्ण घाट परिसराचा नियोजनबद्ध विकास व्हावा, अशी त्यांची भूमिका आहे.

याच अनुषंगाने नाशिक येथून कार्यकारी अभियंतासौ.सोनल शहाणे , उपअभियंता श्री. लव्हाट , आर्किटेक्टश्री शंकर बुचुडे व त्यांची सर्व टीम, तसेच जलसंपदा विभागाचे विविध अधिकारी तसेच जलसंधारण विभागाचे कनिष्ठ अभियंता श्री सोनवणे या सर्वांचे पथक पुणतांबा येथे दाखल झाले.

या विकास आराखड्यामध्ये घाटाची दुरुस्ती व सुशोभीकरण, अहिल्या पार्क, अहिल्यादेवी स्मारक, बोटिंग क्लब आणि पर्यटनाला चालना देणाऱ्या विविध सुविधा उभारण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

पाहणीदरम्यान माजी सरपंच डॉ. धनंजय धनवटे, ग्रामपंचायत सदस्य भूषण वाघ, रामचंद्र पवार, , नितीन भगत, अमोल सराळकर, निलेश संकलेचा,अशोक गायकवाड, राहुल धनवटे तसेच मंदिर सेवा समितीचे सुरेश दाभाडे, श्कृष्ण ढोकचौलें आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पथकाने अहिल्यादेवी घाटासह शनी मंदिर, अन्नपूर्णा मंदिर, महादेव मंदिर, कार्तिकस्वामी मंदिर, मामे भाचे मंदिर, ब्राह्मण घाट आणि सीता कुंड या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांची सविस्तर पाहणी करून विकासाच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा अभ्यास केला.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या निर्देशानुसार विविध तांत्रिक सर्वेक्षणे करून संपूर्ण घाट परिसराचा भव्य आणि आकर्षक विकास आराखडा तयार करण्यात येणार असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला गती देण्यासाठी संबंधित यंत्रणा कामाला लागली आहे.



# शेतकरी कन्या गौरी काळे हिचा आदर्श मुलींनी घ्यावा : प्राचार्य टी. ई. शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** शेतीतील कष्टाची कामे सांभाळत शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या भोकर शिवारातील गौरी पोपटराव काळे हिचा आदर्श ग्रामीण व शहरी मुलींनी घ्यावा, असे प्रतिपादन माजी प्राचार्य टी. ई. शेळके यांनी केले.

श्रीरामपूर येथील वाचन संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने सीईटी परीक्षेत ९८ टक्के गुण मिळविलेल्या गौरी काळे हिच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करत स्त्री शिक्षणाचे महत्त्व विशद केले.


प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे यांनी गौरी व अश्विनी काळे या बहिणींनी शेतीतील कष्टांसह डॉक्टर होण्याचे स्वप्न जोपासल्याचे सांगून त्यांच्या जिद्दीचे कौतुक केले. प्रा. शिवाजीराव बारगळ यांनी पोपटराव काळे यांनी मुलींवर शिक्षण व संस्कारांची भक्कम पायाभरणी केल्याचे नमूद केले.

यावेळी बबनराव काळे यांनी वाचन संस्कृती प्रतिष्ठानने दिलेल्या पुस्तकांमुळे कुटुंबात वाचनाची आवड निर्माण झाल्याचे सांगितले. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरी काळे व काळे परिवाराचा शाल, पुस्तके व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन पोपटराव काळे यांनी केले.

# नेत्रदान : मृत्यूनंतरही प्रकाश देणारे महादान

## १० जून जागतिक नेत्रदान दिन विशेष

मरणोत्तरही कोणाच्या जीवनात प्रकाश पेरायचा असेल, तर नेत्रदान करा. नेत्रदान म्हणजे मृत्यूनंतर आपल्या डोळ्यांतील कॉर्निया (नेत्रपटल) दान करणे होय. या कॉर्नियाच्या साहाय्याने कॉर्नियामुळे अंधत्व आलेल्या व्यक्तींना पुन्हा दृष्टी मिळू शकते. नेत्रदान हे केवळ दान नसून एका अंध व्यक्तीला नवजीवन देण्याचे महान कार्य आहे. भारतात लाखो लोक कॉर्नियल अंधत्वाने ग्रस्त आहेत आणि त्यांच्यासाठी नेत्रदान हीच आशेची किरण आहे नेत्रदानाचे महत्त्व डोळे हे मानवाला मिळालेली अमूल्य देणगी आहेत. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याचे डोळे जाळले किंवा पुरले जातात; परंतु तेच डोळे दान केल्यास अंध व्यक्तीच्या जीवनात प्रकाश आणू शकतात. एका नेत्रदात्याच्या दोन्ही कॉर्नियामुळे साधारणतः दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते. आधुनिक तंत्रज्ञानामुळे काही परिस्थितींमध्ये अधिक रुग्णांनाही फायदा होऊ शकत नेत्रदान कोण करू शकते? कोणत्याही वयातील स्त्री किंवा पुरुष नेत्रदान करू शकतो. चष्मा वापरणारे व्यक्ती नेत्रदान करू शकतात.मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेली व्यक्तीही नेत्रदान करू शकते. मधुमेह, उच्च रक्तदाब, दमा इत्यादी आजार असलेल्यांनाही बहुतांश वेळा नेत्रदान करता येते. धर्म, जात, लिंग किंवा सामाजिक स्थिती यांचा नेत्रदानाशी ाहीही संबंध नाही नेत्रदानाची प्रक्रिया एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर शक्यतो ४ ते ६ तासांच्या आत जवळच्या आय बँकेशी संपर्क साधावा लागतो. प्रशिक्षित डॉक्टर किंवा तंत्रज्ञ मृत व्यक्तीच्या घरी किंवा रुग्णालयात येऊन प्रक्रिया



पूर्ण करतात. ही प्रक्रिया साधारण १० ते १५ मिनिटांत पूर्ण होते आणि त्यामुळे चेहऱ्याचे विद्रूपीकरण होत नाही किंवा अंत्यसंस्काराला विलंब होत नाही नेत्रदानाबाबतचे गैरसमज

गैरसमज १ : नेत्रदान केल्यास संपूर्ण डोळा काढला जातो. सत्य : प्रत्यारोपणासाठी मुख्यतः कॉर्नियाचा वापर केला जातो. आधुनिक पद्धतींमध्ये संपूर्ण डोळा काढला जात नाही.गैरसमज २ : वृद्ध व्यक्ती नेत्रदान करू शकत नाहीत. सत्य : वय हा अडथळा नाही. कॉर्नियाची गुणवत्ता महत्त्वाची असते. गैरसमज ३ : चष्मा लावणारे किंवा मोतीबिंदू झालेले लोक नेत्रदान करू शकत नाहीत. सत्य : अशा व्यक्तीही नेत्रदान करू शकतात. गैरसमज ४ : नेत्रदानामुळे चेहरा विद्रूप होतो. सत्य : नेत्रदानामुळे चेहऱ्यावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. नेत्रदानासाठी कुटुंबाची भूमिका मृत्यूनंतर नेत्रदानाची अंतिम संमती कुटुंबीयांकडून दिली जाते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या नेत्रदानाच्या इच्छेबद्दल कुटुंबीयांना आधीच माहिती देणे आवश्यक आहे. नेत्रदान हे मृत्यूनंतर सहा तासांच्या आत करता येते समाजात जागृती निर्माण करणे आणि नेत्रदानाची शपथ घेणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी आहे. भारतातील गरजभारतामध्ये कॉर्नियल अंधत्वाने ग्रस्त असलेल्या लाखो रुग्णांना प्रत्यारोपणासाठी कॉर्नियाची आवश्यकता आहे. मात्र उपलब्ध दात्यांची संख्या गरजेच्या तुलनेत खूप कमी आहे. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी नेत्रदानाचा संकल्प करणे काळाची गरज आहे. निष्कर्ष नेत्रदान हे मृत्यूनंतरही मानवतेची सेवा करण्याचे सर्वोच्च उदाहरण आहे. आपण जग सोडल्यानंतरही आपल्या डोळ्यांतून एखादा अंध व्यक्ती हे सुंदर जग पाहू शकतो. म्हणूनच

नेत्रदान करा, अंधांच्या जीवनात प्रकाश फुलवा.

मृत्यूनंतरही जगा – नेत्रदानाद्वारे!


**डॉ . अशोक गावित्रे**
**नेत्रदान देहदान अवयवदान समुपदेशक**

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेचा शुक्रवारी श्रीरामपुरात मेळावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (आजितदादा गट) किसान सभेचे प्रांताध्यक्ष अड वसंतराव मानकर यांनी पक्षाचे संघटन मजबुत करण्यासाठी व शेतकऱ्यांचे प्रश्न जाणुन घेण्यासाठी उत्तर महाराष्ट्राचा झंजावाती दौरा सुरु केला आसुन शुक्रवार दि. १२ जुन रोजी श्रीरामपुर येथे दुपारी ३ वाजता काँग्रेस भवन या ठीकाणी भव्य मेळाव्याचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्टीय सरचिटणीस अविनाश आदिक, माजी आमदार तथा प्रभारी सामाजीक न्यायविभाग महाराष्ट्र प्रदेशचे लहु कानडे, प्रदेश सरचिटणीस आरुणपाटील नाईक, माजी नगराध्यक्षा आणुराधा आदिक हे प्रमुख उपस्थित रहाणार आहेत.

या मेळाव्यासाठी सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे अवाहन राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे उत्तर अहिल्यानगर जिल्हा अध्यक्ष राजेंद्र कोकणे,



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे श्रीरामपुर तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे यांनी केले आहे.

# कोपरगाव येथे मध्यरात्री गुडांचा धुमाकूळ , हत्यारे काढून दहशत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शहरात मध्यरात्रीच्या सुमारास गुंडगिरीचा थरारक प्रकार समोर आला असून, एका टोळक्याने हातात धारदार हत्यारे आणि लाकडी दांडके घेऊन शहरात प्रचंड दहशत माजवली. काल रविवारी (दि. ७) जून २०२६ रोजी रात्री ११ ते १ वाजेच्या सुमारास झालेल्या या राड्यामुळे संपूर्ण कोपरगाव शहर हादरून गेले होते. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांसह विशेषतः धारणगावरोड परिसरात या तरुणांच्या टोळक्याने धुमाकूळ घातला. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनेक वाहनांवर या टोळक्याने थेट हल्ला चढवला.धारदार हत्यारे आणि दांडक्यांनी वाहनांच्या काचा फोडत, वाहनांचे मोठे नुकसान केले.रात्रीच्या शांततेत अचानक सुरू झालेली दगडफेक,वाहनांची तोडफोड आणि आरडाओरड्यामुळे घरात शांत झोपलेले नागरिक आणि महिला भयभीत होऊन जागे झाले. परिसरात कमालीचे भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचे प्रत्यक्षदर्शी स्थानिक नागरिकांनी सांगितले आहे.मावा दिला नाही म्हणून, हा वाद सुरू झाला असल्याचे बोलले जात असले तरी, मात्र अधिकृत माहिती पोलीस दरबारी नोंद झाल्यानंतर समोर येणार आहे. नेमका हा वाद कशामुळे झाला आणि शांत कोपरगावात मध्यरात्री हा हैदोस का घालण्यात आला, याचे कारण अद्याप समोर आलेले नाही.विशेष म्हणजे, सकाळपर्यंत कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात याप्रकरणी कोणत्याही गुन्ह्याची नोंद झाली नव्हती. त्यामुळे दहशत माजवणारे हे कोण होते? हे गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.मात्र, मध्यरात्री इतक्या मोठ्या संख्येने तरुण हातात उघडी हत्यारे घेऊन फिरतात आणि धुमाकूळ घालतात, यामुळे कोपरगावात पोलिसांचा धाक उरला आहे की नाही? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. पोलीस प्रशासनाने या गुंडगिरीची तात्काळ गांभीर्याने दखल घेऊन, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे आरोपींना बेड्या ठोकाव्यात आणि त्यांना कठोर अद्दल घडवावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहेत.

**पोलिसाचा धाक संपला का?**

सध्या गुंड प्रवृत्ती लोकांकडून धमक्या दिल्या जात आहेत. शहरात अवैधरित्या चालणारे धंदे सुरू आहेत.यातच पोलीस प्रशासन व्यस्त असल्याचे दिसते. सध्यातरी पोलिसाचा धाक संपला की काय ? चित्र पहायला मिळते.

# मिल्लतनगर, फातिमा हाऊसिंग सोसायटीतील आरक्षित ओपन स्पेस कागदावरच

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर (शफीक बागवान)-** गजबजलेल्या तसेच शहराचा एक अविभाज्य अंग बनलेल्या आणि स्मार्ट उपनगर म्हणून अलीकडे ओळख मिळविलेल्या मिल्लत नगर आणि फातिमा हाऊसिंग सोसायटीतील श्रीरामपूर नगरपालिकेने आरक्षित केलेले ओपन स्पेस गेल्या अनेक वर्षांपासून आजही कागदावरच आहेत.

वॉर्ड नंबर दोन कॅनॉल पलीकडे ही उपनगरे गेल्या २५ वर्षांपासून बहरली आहेत. एका रांगेत सुंदर घरांची रचना, प्रशस्त रस्ते आणि निवांत एरिया अशा स्मार्ट सिटी ला शोभणाऱ्या या उपनगरात रहिवाशांना पालिकेकडून दैनंदिन सुविधा मिळत असल्या तरी अत्यंत महत्त्वाच्या ऑक्सीजन पार्क, उद्याने बगीचे भाजी मंडई अशा विविध प्रकारच्या सोयी सुविधांसाठी आरक्षित केलेले ओपन स्पेस श्रीरामपूर नगरपालिकेच्या दुर्लक्षिता मुळे गेल्या वर्षानुवर्षांपासून ओसाड पडलेले आहेत.

राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असलेला हा भाग गेल्या काही वर्षांपासून नागरिकांच्या अत्यंत गरजेच्या असलेल्या सोयी सुविधांपासून वंचित आहे. या ओपन स्पेस चा पालिका निश्चित विकास करेल, अशा कल्पनेने नागरिक वाट पाहत आहे. या मैदाना वर वृक्ष लागवडी बरोबरच बसण्यासाठी बाके, मैदानांची स्वच्छता तसेच इतर अनुषंगिक बाबी तातडीने उपलब्ध करून देण्याची या उपनगरातील शेकडो नागरिकांची वर्षानुवर्षापासूनची मागणी आहे.

ओपन स्पेस विकसित होत नसल्यामुळे या भागातील अनेक लहान मुले वृद्ध तसेच इतरही नागरिकांनी पालिकेबाबत नाराजी



व्यक्त केली आहे. श्रीरामपूर नगरपालिकेला या खुल्या जागांचा विकास करण्याची संधी असून पालिका मात्र या भागात हात राखून काम करीत असल्याची मोठी चर्चा अलीकडे या भागात सुरू झाली आहे.

पालिकेने या 'ओपन स्पेस' (मोकळ्या जागा) वर सार्वजनिक सुविधेत मोडणारी क्रीडांगणे, उद्याने, जॉगिंग ट्रॅक आणि विरंगुळा केंद्र तसेच स्थानिक नागरिकांचे आरोग्य, पर्यावरण आणि मनोरंजनाला प्राधान्य देण्याबरोबरच ओपन स्पेसच्या जागेनुसार लहान मुलांसाठी सुरक्षित खेळणी, पाळणे, घसरगुंडी तर तरुणांसाठी बास्केटबॉल कोर्ट, व्हॉलीबॉल कोर्ट, स्केटिंग एरिया, खुल्या व्यायामशाळा (जशिप त्रू) आणि सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून चालण्यासाठी व धावण्यासाठी जॉगिंग ट्रॅक, सायकलिंग ट्रॅक आणि योगा करण्यासाठी या ओपन स्पेसचा विकास करावा, अशी नागरिकांची इच्छा आणि सर्व स्तरातून मागणी आहे.


याशिवाय वृद्ध ज्येष्ठ नागरिकांकरिता निवांत बसण्यासाठी बाकडे, सावली देणारी झाडे आणि फिरण्यासाठी पेव्हर ब्लॉकचे पाथवे शिवाय पर्यावरणा साठी जास्तीत जास्त वृक्षारोपण, लहान तलाव किंवा कारंजे याव्यतिरिक्त, गरजेनुसार काही जागांवर भूमिगत पार्किंग सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि पुस्तकालये देखील पालिकेने उभारून या उपनगरातील हजारो नागरिकांना न्याय आणि आनंद द्यावा, अशी मागणी सर्वच नागरिक करीत आहेत.

# अवाजवी फी आकारणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कारवाईची मागणी

## रिपाईचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यासह श्रीरामपूर शहरातील खाजगी कोचिंग क्लासेसकडून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारले जात असल्याचा आरोप करत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या (रिपाई) वतीने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले. बेकायदेशीररीत्या अथवा नियमांचे उल्लंघन करून क्लासेस चालविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्याची माहिती रिपाईचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी दिली.निवेदनात श्रीरामपूर शहरात इयत्ता पहिलीपासून पदवी स्तरापर्यंत मोठ्या प्रमाणावर कोचिंग क्लासेस सुरू असून त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांकडून हजारो ते लाखो रुपयांपर्यंत शुल्क आकारले जात असल्याने पालकांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.त्रिभुवन यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करताना नीट परीक्षेतील गैरप्रकार, विद्यार्थ्यांवरील वाढता ताण, अपुऱ्या सुविधा, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची गर्दी, शिक्षकांच्या पात्रतेबाबतचे प्रश्न तसेच फायर सेफ्टी, स्वच्छतागृहे आणि इमारत सुरक्षेसारख्या नियमांचे उल्लंघन होत असल्याच्या तक्रारी मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निरीक्षण समितीने कोचिंग क्लासेसची नियमित तपासणी करावी, शुल्काबाबत पारदर्शकता आणावी आणि प्रत्येक क्लाससमोर फी संरचनेचा फलक लावणे बंधनकारक करावे, अशी मागणीही करण्यात आली.विद्यार्थी व पालकांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा रिपाईच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.




हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailD- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# १५ जून पर्यंत सरसकट कर्ज माफीचा आदेश काढा, अन्यथा 'वर्षा'वर मोर्चा

## हे तर शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणारे सरकार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी यासाठी राहुरी येथे नगर मनमाड महामार्गावर कृषी उत्पन्न बाजार समिती समोर शेतकरी सेनेचे रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी ते म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला होता की शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू परंतु त्यांनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली. असा घणाघाती आरोप करत शिंदे शेतकरी सेनेचे उपाध्यक्ष व शिंदे सेनेचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र मोरे यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. येत्या १५ जुन पर्यंत शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्याचा आदेश करण्यात आला नाही तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर राज्यातील सर्व शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा सुचक इशारा त्यांनी दिला.

आंदोलनात बोलताना रवींद्र मोरे म्हणाले की, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री


छाया: राजेंद्र परदेशी

असते तर शेतकऱ्यांवर अशी आर्थिक संकटाची परिस्थिती ओढवली नसती. मात्र सध्याचे सरकार शेतकरीविरोधी धोरणे राबवित असल्याने शेतकरीआर्थिकदृष्ट्या पूर्णपणे कोलमडला असून शेतीमालाचा वाढता खर्च , नैसर्गिक आपत्ती, अपुरा वीजपुरवठा आणि शेतीमालाला मिळणारा अत्यल्प बाजारभाव यामुळे राज्यातील शेतकरी संपूर्णपणे कर्जाच्या खाईत लोटला गेला आहे. ऊस, कापूस, सोयाबीन आणि इतर पिकांना उत्पादन खर्चाच्या तुलनेत योग्य भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. साखर निर्यातीवरील निर्बंध आणि कापूस आयातीमुळे स्थानिक उत्पादकांना फटका बसला असून अनेक साखर कारखान्यांकडून ऊस उत्पादकांची एफआरपी व इतर देयके अद्याप थकित असल्याचा आरोप केला. तीन तीन महिने ऊस देऊन सुद्धा शेतकऱ्यांना त्याची दमडीही मिळाली नाही त्यांच्यावर कारवाई का नाही.

> विधानसभा निवडणुकीच्या वेळेस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचा संपूर्ण सातबारा कोरा करू असे आश्वासन दिले होते परंतु सत्ता आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली असून त्यांनी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेत दहा टक्के सुद्धा शेतकरी बसत नाहीत त्यामुळे १५ जूनच्या आत जर शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याचा आदेश सरकारने केला नाही तर राज्यातील सर्व शेतकरी वर्षा बंगल्यावर आंदोलन करणार आहेत.
>
> **रवींद्र मोरे, शेतकऱ्यांचे नेते, शिवसेना प्रदेशाध्यक्ष, शिंदे सेना**

राज्यातील सर्व शेतकऱ्यांसह पात्र-अपात्र निकष बाजूला ठेवून दोन लाख रुपयांपर्यंत सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, कर्जमाफीसाठी कोणत्याही अटी लागू करू नयेत, कृषी पंपांसाठी दिवसा किमान आठ तास अखंड व पूर्ण क्षमतेचा वीजपुरवठा करावा,शेतीमालाला हमीभाव मिळावा तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी फेडरेशनमार्फत प्रतिक्विंटल २५०० रुपयांच्या दराने खरेदी सुरू करावी, अशा प्रमुख मागण्या केल्या. या आंदोलनादरम्यान नगर मनमाड महामार्गावर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती यावेळी पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवला होता

आंदोलना दरम्यान करण्यात आलेल्या सर्व मागण्यांचे निवेदन राहुरीच्या नायब तहसीलदार संध्या दळवी यांना सर्व शेतकऱ्यांच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनात रवींद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रकाश देठे, सचिन करपे, राजेंद्र लोंढे, अमोल मोढे आदी सहभागी झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे किरण कडू यांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. वंचित आघाडीचे बाळासाहेब जाधव आणि संतोष चोळके यांनीही शेतकऱ्यांच्या मागण्यांना समर्थन जाहीर केले आहे. यावेळी राहुरी तालुक्यातील अनेक शेतकरी यांनी आंदोलन स्थळी येऊन या आंदोलनाला पाठिंबा दिला.

---

द·ख·ल

## उंबरी बाळापूर येथे प्रवरेच्या कृषीदूतांचे आगमन




**लोणी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषीदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले. कृषीदूत श्रेयश नवधर, सतिष ढवाण, धिरज पाटील, ओम संधान, सुजय लांडगे हे उंबरी बाळापूर येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी उंबरी बाळापूर गावाच्या सरपंच अर्चना भुसाळ, उपसरपंच मच्छिंद्र भुसाळ ग्रामपंचायतचे कर्मचारी संदिप रोकडे, भास्कर पवार तसेच ग्रामपंचायत सदस्य अभिषेक भुसाळ, डॉ. अनिल सारंबदे आणि सामाजिक कार्यकर्ते सागर डोखे व इतर ग्रामस्थ यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, फळबागा, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस इ. संदर्भात माहिती देणार आहे.

## 'मुळे' शाळेच्या 'ईश्वरी'ची इस्त्रो सहलीसाठी निवड



**श्रीरामपूर** : येथील कै. अनिल दिगंबर मुळे प्राथमिक शाळेच्या ईश्वरी राहुल देवकर हिने राज्यस्तरीय सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेत तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावला. तिची इस्त्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड झाल्याने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. ईश्वरीने केवळ सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षेसह भारत टॅलेंट सर्च परीक्षेतही श्रीरामपूर केंद्रात तृतीय क्रमांक मिळवत दुहेरी यशाला गवसनी घातली आहे.शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना देठे यांनी सांगितले की, संस्था प्रमुख संजय बापू कुलकर्णी, अध्यक्ष निशांत कुलकर्णी, सचिव सुनिता कुलकर्णी, विश्वस्त संतोष कावले व मधुकर मेहत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांचा हा परिपाक आहे.

विद्यार्थ्यांची मेहनत आणि शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले. ईश्वरीला वर्गशिक्षिका जयश्री क्षिरसागर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ईश्वरीच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती सदस्य तसेच पालकांनी अभिनंदन करून कौतुकाचा वर्षाव केला आहे.

## श्रीरामपूर तालुक्यातील २९ ग्रामपंचायतींसाठी सदस्य आरक्षण सोडत जाहीर

**श्रीरामपूर** : आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर तालुक्यातील मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या २९ ग्रामपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही प्रक्रिया १० ते १२ जूनदरम्यान संबंधित ग्रामपंचायतींमध्ये आयोजित विशेष ग्रामसभांमधून पार पाडण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी दिली. सदस्य पदांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग तसेच महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया नियोजित करण्यात आली आहे. आरक्षण सोडत पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने पार पडावी यासाठी महसूल, ग्रामविकास व पंचायत प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रत्येक ग्रामसभेसाठी स्वतंत्र अध्यासी अधिकारी व पर्यवेक्षक नेमण्यात आले असून संपूर्ण प्रक्रियेवर त्यांचे नियंत्रण राहणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून आरक्षण निश्चितीची कार्यवाही पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. सोडत प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेचे इतिवृत्त आणि अहवाल विहित कालावधीत तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात येणार आहेत. ग्रामपंचायत निवडणुकांपूर्वी होणाऱ्या या आरक्षण सोडतीमुळे विविध प्रभागांतील निवडणुकीचे समीकरण स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवार, स्थानिक राजकीय गट आणि ग्रामस्थांचे लक्ष या प्रक्रियेकडे लागले आहे. संपूर्ण प्रक्रिया खुली, निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केल्याचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी सांगितले.

---

## गुणवत्तापूर्ण कृषी उत्पादनांतून स्वतःची ओळख निर्माण करा : डॉ. सुरेश दोडके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : बाजारपेठेत गुणवत्तापूर्ण उत्पादनांना नेहमीच मागणी असते. प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून युवकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःचे प्रक्रिया उद्योग उभारावेत. प्रखर इच्छाशक्ती आणि जोखीम पत्करण्याचे धाडस असेल तर कोणताही प्रक्रिया उद्योग यशस्वी करता येतो. गुणवत्तापूर्ण कृषी उत्पादनांच्या निर्मितीतून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करा, असे आवाहन महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या पदव्युत्तर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुरेश दोडके यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजित पाच दिवसीय आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ. विक्रम कड व डॉ. गणेश शेळके उपस्थित होते.

डॉ. विक्रम कड यांनी प्रशिक्षणार्थींना उद्योग उभारणीसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन व सल्ला देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.


या प्रशिक्षणात आंब्यापासून सरबत, स्क्वॅश, गर, लोणचे, मुरंबा, जॅम, पावडर, पन्हे व आंबापोळी आदी पदार्थांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. तसेच अन्न सुरक्षा कायदा, उद्योग नोंदणी, मशिनरी, पॅकेजिंग, मार्केटिंग आणि शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. प्रशिक्षणात राज्यातील विविध जिल्ह्यांतील २४ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन राहुल घुगे यांनी तर आभार गोरक्षनाथ चौधरी यांनी मानले.

## शाश्वत भाजीपाला व कांदा मूल्यसाखळी विकासासाठी राज्यस्तरीय परिषद संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : महाराष्ट्रातील भाजीपाला क्षेत्र अधिक शाश्वत, स्पर्धात्मक आणि बाजाराभिमुख करण्याच्या उद्देशाने इंडो व्हेजिटेबल्स डेव्हलपमेंट असोसिएशन (IVDA) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय 'भाजीपाला मूल्यसाखळी परिषद' शिर्डी येथे उत्साहात पार पडली. महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या SMART प्रकल्पांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या कमोडिटी स्टुअर्डशिप कौन्सिल (CSC) उपक्रमाच्या माध्यमातून या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. IVDA चे उपाध्यक्ष डॉ. संतोष सहाणे यांनी प्रास्ताविक केले, तर अध्यक्ष सारंगधर निर्मळ यांनी परिषदेची भूमिका स्पष्ट केली. माजी कुलगुरू डॉ. के. ई. लवांडे, महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमाकांत दांगट आणि महानंदचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांनी मार्गदर्शन केले.



परिषदेत भाजीपाला व कांदा मूल्यसाखळी विकासावर दोन तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या सत्रात मृदा आरोग्य संवर्धन, जैव-निविष्ठांचा वापर, अवशेषमुक्त व सेंद्रिय शेती आणि उत्पादन खर्च कमी करण्याच्या उपायांवर चर्चा झाली. अवशेषमुक्त व विषमुक्त उत्पादनांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी असून त्यासाठी सक्षम प्रमाणन व्यवस्था आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले.

दुसऱ्या सत्रात कांदा मूल्यसाखळी विकास, बियाणे प्रमाणन, ट्रेसिबिलिटी, बाजारातील पारदर्शकता आणि शेतकऱ्यांना न्याय्य दर मिळवून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर विचारमंथन झाले. कांदा उत्पादन व लागवडीचा एकात्मिक डेटाबेस विकसित करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली.

स्टार्टअप संवाद सत्रात कृषी क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञानाधारित उपाययोजना, मृदा आरोग्य व्यवस्थापन आणि शेतकरी सक्षमीकरण यावर चर्चा झाली. कृषी क्षेत्रातील शाश्वत विकासासाठी स्टार्टअप्सची भूमिका महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन करण्यात आले. समारोपप्रसंगी प्रियांका शेळके यांनी आभार मानले. भाजीपाला क्षेत्रातील गुणवत्ता मानकीकरण, मूल्यवर्धन व शेतकरी हितसंवर्धनासाठी IVDA कटिबद्ध असून परिषदेतून पुढे आलेल्या शिफारशींवर आधारित विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

---

## श्रीरामपूर - नेवासा रोडवरील अतिक्रमण धारकांना नोटीस

### अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान गावांमधून जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग क्रमांक ५० वरील श्रीरामपूर नेवासा रोडवरील गावाच्या दुतर्फा अतिक्रमण केलेल्या अतिक्रमण धारक व अनधिकृत बांधकाम केलेल्या व्यावसायिक, अतिक्रमण केलेल्या लोकांना सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीरामपूर यांनी नोटीस काढून ८ दिवसाच्या आत अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले आहेत. अन्यथा पोलीस संरक्षणामध्ये व शासनाच्या नियंत्रणाखाली अतिक्रमण काढण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे अतिक्रमण केलेल्या व्यावसायिक व तात्पुरत्या रहिवासी लोकांचे धाबे दणाणले आहेत.



काल दिनांक ९ जून रोजी सार्वजनिक बांधकाम उपविभाग श्रीरामपूर येथील अधिकारी व सर्व स्टाफ यांनी टाकळीभान येथे राज्य मार्ग क्र.५० श्रीरामपूर नेवासा रोडवरील रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण केलेल्या व्यावसायिक व तात्पुरत्या रहिवासी लोकांना प्रत्यक्ष उपस्थित राहून नोटीस बजावली आहे. तसेच या राज्य मार्ग क्रमांक ५० च्या मध्यापासून दोन्ही बाजूच्या ५० फुटापर्यंत येणारे सर्व अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम ८ दिवसाच्या आत तात्काळ काढण्यासाठी नोटीसीद्वारे सूचना केली आहे. सार्वजनिक बांधकाम उप विभाग श्रीरामपूरच्या अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून रस्त्याच्या मध्यापासून ५० फुटापर्यंत अंतर मोजून अतिक्रमण मध्ये येणाऱ्या व्यावसायिक व तात्पुरत्या अनधिकृत अतिक्रमण केलेल्या रहिवाशांना नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याच्या सूचना केल्या आहेत व अतिक्रमण न काढल्यास पोलीस संरक्षणामध्ये सदर अतिक्रमण काढण्यात येऊन त्याचा खर्च अतिक्रमण धारकाकडून वसूल करण्यात येईल असा इशारा दिला आहे. त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेमध्ये बांधकामासाठी सदर व्यक्तींकडे महसूल खात्याची मंजुरी असल्यास त्याची प्रत सादर करण्याची माहिती त्यांनी दिली आहे.

तसेच सदर अतिक्रमणधारकांनी रस्ता वाहतुकीस अडथळा करून अपघातजन्य स्थळ तयार झालेले आहे व त्यामुळे सदर ठिकाणी अपघात होऊन जीवित हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अतिक्रमण धारकाची राहील असेही उल्लेख त्यांनी नोटिसीमध्ये केला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीतील व शासकीय जागेवरील अतिक्रमणचा मुद्दा गाजत असून त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सज्जड कारवाईने अतिक्रमण धारकांना कडक इशारा मिळाला आहे.

## कांदा मार्केट सुरू केल्याबद्दल सभापतींचा सन्मान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कांदा मार्केट सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा दिल्याबद्दल अमरनाथ मॉर्निंग वॉक ग्रुपच्या वतीने बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना नंदकुमार पाटील यांनी सांगितले की, माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कांदा मार्केट सुरू करण्यात आले असून मंगळवार व गुरुवारच्या लिलावांना मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता आता दर रविवारीही कांदा लिलाव भरविण्यात येणार आहे. कांदा विक्रीनंतर शेतकऱ्यांना जागेवरच पैसे दिले जात असल्याने नेवासा तालुक्यासह इतर भागांतील उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बाजार समितीत कांदा विक्रीसाठी येत आहेत. कांद्याला चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून बाजारपेठेतील आर्थिक उलाढालीतही वाढ होत आहे. भविष्यात धान्य बाजार तसेच डाळिंब विक्रीसाठीही स्वतंत्र बाजार व्यवस्था सुरू करण्याचा विचार संचालक मंडळ करीत असल्याचे त्यांनी सांगितले. बाजार समितीच्या माध्यमातून आर्थिक उलाढाल वाढवून शहराच्या व्यापार वृद्धीसाठी प्रयत्न केले जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास ज्येष्ठ व्यापारी विठ्ठलराव साळुंके, बालेंद्र पोतदार, रविंद्र जोशी, मेजर अरुण धनक, किशोर गारुळे, शशिकांत नळकांडे, राजेंद्र महाजन, जालिंदर गवळी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पत्रकार सुधीर चव्हाण यांनी आभार मानले.

---

## पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्डद्वारे पशुपालकांना ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालकांसाठी 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराने ३ लाख रुपयांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे.

यामुळे पशुपालक व दुग्धव्यवसायिक शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळणार असल्याची माहिती आ. अमोल खताळ यांनी दिली. संगमनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतकरी दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन व वराहपालन व्यवसाय करत आहेत. पशुधनाच्या संगोपनासाठी तसेच दैनंदिन खर्चासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध व्हावे या उद्देशाने ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत असल्याचे आ. खताळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले.

योजनेनुसार ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १ लाख ६० हजार रुपयांपर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध होणार आहे. दूध संस्थेच्या हमीवर ही पतमर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढविता येणार आहे. तसेच, ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे, त्यांनाही ३ लाख रुपयांपर्यंत पतमर्यादा वाढवून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे. कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के आणि राज्य शासनाकडून ४ टक्के अशी एकूण ७ टक्के व्याज सवलत मिळणार आहे.

> पशुपालक आणि दुग्धव्यवसाय करणारे शेतकरी हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या व्यवसायाला आर्थिक बळ मिळावे, पशुधनाच्या संगोपनासाठी आवश्यक भांडवल सहज उपलब्ध व्हावे आणि शेतकऱ्यांना सावकारीपासून दिलासा मिळावा, यासाठी शासनाने 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' योजना सुरू केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालकांना शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळणार असल्याने या योजनेचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.
>
> **आ. अमोल खताळ (संगमनेर विधानसभा)**

याशिवाय बँकांकडूनही २ टक्के सवलत दिली जात असल्याने पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजदराचा लाभ मिळू शकणार आहे. दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले व अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेले सर्व पशुपालक या योजनेसाठी पात्र आहेत. अधिक माहितीसाठी जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा किंवा १९६२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

निशाणी नं. ८०
नेमलेली ता.०२.०७.२०२६

### जाहीर नोटीस

ॲड. एन.ए.मोटे

नेवासा येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब व. स्तर यांचे कोर्टात
वारस चौकशी अर्ज नं. ५७/२०२६

**अर्जदार**
१. सुनंदा कुंडलिक भांगे वय ७५ वर्षे,
२. अनिल कुंडलिक भांगे वय ५२ वर्षे,
३. भरत कुंडलिक भांगे वय ५० वर्षे,
सर्वांचा धंदा शेती, सर्व रा. खडके ता. नेवासा, जि. अहिल्यानगर

**सामनेवाला**
कोणीही नाही. (मयत नामे कुंडलिक गोविंदराव भांगे मयत दि. २६.१०.२०२५)

वरील अर्जदार यांनी न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता वारस चौकशी अर्ज नं.५७/२०२६ दाखल केलेला आहे. अर्जदार नं. १ ही मयत कुंडलिक गोविंदराव भांगे यांची पत्नी असुन अर्जदार नं. २ व ३ यांचे मयत कुंडलिक गोविंदराव भांगे हे वडिल होते. मयत कुंडलिक गोविंदराव भांग हे दि. २६.१०.२०२५ रोजी मौजे खडके, ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. वर नमुद अर्जदार हेच मयताचे वारस आहे. त्याचे व्यतीरिक्त मयतास कोणीही वारस नाही. मयत कुंडलिक गोविंदराव भांगे यांचे बँक ऑफ बडौदा शाखा प्रवरासंगम, ता. नेवासा येथे खाते नं. १७६५०१०००००९६६ हे खाते तसेच एफ.डी. खाते नं. १७६५०३००००८५८४ हे खाते तसेच १७६५०३००००४४७६ हे खाते आहे. सदर खात्यास अर्जदार यांचे शिवाय इतर कोणीही वारस नसुन अर्जदार हेच वारस असल्यामुळे तसे वारसप्रमाणे मिळणेकामी या न्यायालयात सदरचा वारस चौकशी अर्ज दाखल केलेला आहे.

तरी सदर अर्जदार हे सदर मयताचे वारस नाही अगर वारस नोंदी बाबत तक्रारी, हरकती असे कोणाचे काही म्हणने असल्यास तसेच सदर अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन एक महिन्याच्या आत किंवा दि.०२.०७.२०२६ पर्यंत स्वतः किंवा वकिला मार्फत हजर होवुन हरकती दाखल कराव्यात. सदर वारस चौकशी अर्जावर हरकती प्राप्त न झाल्यास वारसाबाबत काही एक म्हणने नाही असे समजुन मे. कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेऊन मयत कुंडलिक गोविंदराव भांगे यांचे अर्जदार हेच वारस असल्याचे प्रमाणपत्र अर्जदाराचे लाभात देण्याचे आदेश करतील.

आज दि.०९.०६.२०२६ रोजी माझी सही निशाणी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले असे. पुढील नेमलेली तारीख ०२.०७.२०२६

**तयार करणार
व लिपीक**

शिक्का

**आदेशावरुन
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर
नेवासा**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णनः-जिल्हा अहिल्यानगर, ता. श्रीरामपूर पैकी मौजे वडाळामहादेव ग्रामपंचायत हद्दीतील बागायत शेतजमिन मिळकत अ) गट नं. २३६/ब/२ पैकी क्षेत्र ०० हे १५ आर यांसी आकार ०० रू १७ पैसे ही शेतजमीन मिळकत यांसी चतुःसिमा पुर्वेस गट नं. २३८ पैकी शेतजमीन मिळकत, दक्षिणेस गट नं. २३६/१ पैकी थी गोरे व गट नं २३६/ब/२ पैकी शेतजमीन मिळकत, पश्चिमेस गट नं. २३६/ब/२ पैकी शेतजमीन मिळकत, उत्तरेसः-गट नं. २३७/१ पैकी शेतजमीन मिळकत, तसेच ब) गट नं. २३७/१ पैकी क्षेत्र ०० हे २० आर यांसी आकार ०० रू. २१ पैसे ही शेतजमीन मिळकत. तसेच क) गट नं २३७/१ पैकी क्षेत्र ०० हे ३५ आर यांसी आकार ०० रू. ३६ पैसे ही शेतजमीन मिळकत यांसी ब) आणि क) मिळकतीच्या एकत्रित चतुः सिमा पुर्वेसः गट नं. २३७/१ पैकी शेतजमीन मिळकत, दक्षिणेस : सरकारी जमिन व कॅनॉल, पश्चिमेस : २३७/१, उत्तरेस : गट नं २३६/ब/२ पैकी शेतजमीन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक यांनी सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जीत, निर्जोखीम, बोजारहीत असल्याचा खात्रीशीर निर्वाळा भरोसा देवून आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरले आहे. सदर व्यवहारामध्ये कोणाचीही तक्रार व हरकत राहु नये या करीता या जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, सदर शेतजमीन मिळकतीबाबत कोणाचीही कसलाही हरकत अथवा सदर मिळकत ही गहान, दान, लिज, लिन, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, करारनामा, साठेखत, विसार पावती, वारसाहक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कसलाही कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास संबधीतांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून ७ दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्यावर समक्ष मुळ कागदपत्रासह आमचे अशिलांची खात्री करून द्यावी, परस्पर वृत्तपत्रात दिलेला खुलासा आमचे अशिल हे मान्य करणार नाही अन्यथा दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास ज्यांचे कोणतेही कसलेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ते जाणून बुजुन सोडून दिलेले आहे असे समजुन आमचे अशिल सदर शेतजमीन मिळकतीचा विद्यमान मालक यांचेशी खरेदीचा व्यवहार दुय्यम निबंधक कार्यालय श्रीरामपुर यांचेकडे नोंदवुन पुर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कसलीही तकार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे, ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.
श्रीरामपूर
दि.०९/०६/२०२६

**ॲड, सचिन बी. वाकडे
ऑफिस नं. ९१. मिनी स्टेडीयम,
२ रा. मजला, नविन कोर्टाजवळ,
श्रीरामपूर, जि. अ. नगर
मो. नं. ७३५०७७१५६६**

## पान १ वरुन

### मुलीवर बळजबरीने उचलून नेऊन अत्याचार

सदरचे साडे सोळा वर्ष मुलीच्या वयाच्या फिर्यादीवरुन श्रीरामपूर शहर पोलिसांनी सुजित भास्कर लोहकरे (रा.उंबरगाव ता.श्रीरामपूर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.पुढील तपास पो. नि.नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.गणेश जाधव हे करीत आहेत.

### जनगणनेत अहिल्यानगर मनपा राज्यात द्वितीय

अधिकारी, ब्रँड अँबेसिडर डॉ. अमोल बागुल, सर्व म ास्टर ट्रेनर टेक्निकल टीम यांचे समन्वित नेतृत्व व अथक परिश्रम मोलाचे ठरले.याबाबत बोलताना महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हणाले की, विशेषत: नागरिकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हे मोहिमेचे यश आहे.प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने स्वत: साठी वेळेची उद्दिष्टे निश्चित करून शिस्तबद्ध पद्धतीने काम केल्यामुळे जनगणना मोहिमेला अपेक्षेपेक्षा अधिक वेग प्राप्त झाला.मोहिमेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी टेक्निकल टीमने तात्काळ सोडविल्या. दर चार दिवसांनी आढावा बैठका घेऊन पुढील चार दिवसांचे नियोजन, वेळापत्रक आणि आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण अभियानात सातत्य, गती आणि अचूकता कायम राखण्यात यश आले. यावेळी बोलताना महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त मुतकेकर म्हणाले की, जनजागृती आणि संवादावर विशेष भर देत विविध नाविन्यपूर्ण माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रेरणादायी गीते, माहितीपर व्हिडिओ, दैनंदिन ग्राफिक इमेजेस, आकाशवाणीवरील मुलाखती, जिंगल्स, रिंगटोन्स तसेच विविध सोशल मीडिया हँडल्सच्या माध्यमातून केवळ नागरिकांचेच नव्हे तर प्रगणक आणि पर्यवेक्षकांचेही सातत्याने प्रबोधन करण्यात आले. यामुळे जनगणना मोहिमेला व्यापक लोकसहभाग लाभला.असे सांगितले.

### बँक ऑफ महाराष्ट्र वाकोडी फाटा शाखेविरोधात

याबाबत चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी. तसेच त्यांनी म ागविलेल्या काही कागदपत्रांपैकी मर्यादित माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून, इतर काही कागदपत्रे व नोंदी अद्याप उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित प्रकरणातील सर्व नोंदींची तपासणी करून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी. दरम्यान, मृत खातेदारांच्या दाव्यांच्या निपटाऱ्याची प्रक्रिया, ग्राहक सेवा, माहिती उपलब्ध करून देण्याची पद्धत तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेशी संबंधित तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदाराने आरबीआय लोकपालांकडे केली आहे.

### भाजप विरोधामुळे छगन भुजबळांची राज्यसभा हुकली..?

जाण्याची इच्छा छगन भुजबळ यांनी व्यक्त केली होती आणि तशी मागणी पण केली होती. पण त्या जागेवर पक्षाकडून राजेंद्र जैन यांना संधी देण्यात आली आहे. समीर भुजबळ म्हणाले की, आम्ही देखील पक्षात स्थापनेपासून काम करत आहोत या पक्षाची स्थापना झाल्यानंतर पहिली सभा शिवाजी पार्क मैदानात घेण्यात आली. त्यासाठी त्यावेळी आम्ही खूप कष्ट केले आहेत आणि या पक्षाच्या झेंड्याच्या कामासाठी असेल किंवा पक्ष दिल्लीच्या निवडणूक आयोगात रजिस्ट्रर करेपर्यंत आम्ही काम केल आहे' असे समीर भुजबळ म्हणाले.

दरम्यान, भुजबळ समर्थक कार्यकर्त्यांनी 'साहेब, निर्णय घ्या' असे पोस्टर्स लावून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. एका कार्यकर्त्याने सांगितले, कार्यकर्त्यांनी भूमिका मांडली आहे की, आता साहेबांनी निर्णय घ्यावा. ही कार्यकर्त्यांची भावना आहे, त्याबाबत आम्ही काय बोलणार? असे समीर भुजबळ म्हणाले.

### ऑपरेशन ब्लु स्टारचा निषेध करणाऱ्या मंत्री महाजनांची हकालपट्टी करा

यांना बलिदान द्यावे लागले त्यावरही महाजन शंका उपस्थित करतात हे अत्यंत आक्षेपार्ह व निषेधार्ह आहे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

विशेष म्हणजे देशाचे विद्यमान राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल हे देखील या कारवाईशी संबंधित सुरक्षा मोहिमांमध्ये सहभागी होते. मग गिरीष महाजन त्यांच्या भूमिकेचाही निषेध करणार आहेत का? त्यांची राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पदावरून हकालपट्टी करण्याची मागणी करणार आहेत का? त्यांच्यात ती हिंमत आहे का, असा सवाल सपकाळ यांनी केला.भारतीय सैन्यदलाने देशाच्या अखंडतेसाठी राबविलेल्या मोहिमेची महंमद शाह अब्दालीशी तुलना करून गिरीष महाजन यांनी प्रत्यक्षात भारतीय सैन्यदलाचाच अपमान केला आहे. एवढेच नव्हे तर खलिस्तानी दहशतवादी जर्नैलसिंग भिंद्रनवाले याचे उदात्तीकरण करण्याचाही त्यांनी प्रयत्न केला आहे. देशाच्या सार्वभौमत्वाविरोधात शस्त्रे उगारणाऱ्या दहशतवाद्यांविषयी सहानुभूती निर्माण करणारी भूमिका घेणे अत्यंत गंभीर बाब आहे.

### कोकणात दमदार पाऊस

व्यक्त करण्यात आला आहे. मुंबई, पुणे आणि नाशिकसह राज्यातील जवळपास २५ ते ३० जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे.मुंबई, ठाणे, पालघर आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह चांगल्या पावसाची शक्यता आहे.

पुणे, सातारा आणि कोल्हापूर परिसरात मान्सून सक्रिय असून मुसळधार पाऊस पडू शकतो. तसेच नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातही विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याचा अंदाज आहे.मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळतील.

### राष्ट्रवादीचे राजेंद्र जैन राज्यसभेवर बिनविरोध

हा अर्ज छाननीत बाद होईल. प्राप्त उमेदवारी अर्जांची मंगळवारी छाननी होईल. या पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत ११ जून अशी आहे. त्यामुळे ही मुदत संपल्यानंतर जैन यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली जाईल. दरम्यान, जैन यांचा उमेदवारी अर्ज दाखल करतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, आशिष शेलार, भरत गोगावले, माजी मंत्री दिलीप वळसे- पाटील, खासदार पार्थ पवार, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी खासदार समीर भुजबळ आदी उपस्थित होते.

# शिर्डीतील साई तीर्थला नक्की भेट द्यावे ; श्रेया मालपानी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : आता शिर्डीची सहल केवळ मंदिराच्या दर्शनांपुरती मर्यादित राहिलेली नाही. साईबाबा मंदिरापासून अवघ्या ५ मिनिटांच्या अंतरावर असलेले इमॅजिकाचे 'साई तीर्थ भक्ती थीम पार्क' हे शिर्डीच्या प्रमुख पर्यटन आकर्षणांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. यात पर्यटकांना एकाच छताखाली अध्यात्म, मनोरंजन, तंत्रज्ञान, कथाकथन आणि संस्कृती यांचा मिलाफ मिळतो.

साई तीर्थ हे भारतातील पहिले इनडोअर, पूर्णपणे वातानुकूलित भक्ती थीम पार्क आहे, ही गोष्ट त्याचे ठळक वेगळेपण आहे. सर्व वयोगटातील अभ्यागतांसाठी तो एक आरामदायक आणि कौटुंबिक अनुभव ठरतो, विशेषत: दर्शनानंतर. आणखी एक भक्तीचे स्थान म्हणून नव्हे तर संपूर्ण अनुभवाचे डेस्टिनेशन म्हणून याची रचना करण्यात आली असून, 'साई तीर्थ' या माध्यमातून कुटुंबे, मुले, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण प्रवाशांना समरस होण्याजोगी आकर्षणे, सिनेमॅटिक कथाकथन, परस्परसंवादी अनुभव आणि नेत्रदीपक थेट मनोरंजनाद्वारे एकत्र दर्जेदार वेळ घालवता येतो.

साई तीर्थ शिर्डीमधील नक्की भेट देण्याजोगे ठिकाण बनविणारे ५ अनुभव आहेत : १. तीर्थ यात्रा – संपूर्ण भारताचा आध्यात्मिक प्रवास तीर्थ यात्रा अभ्यागतांना भारताच्या विविध भागांतील १० प्रतिष्ठित मंदिरांचा जादुई प्रवास घडवून आणते. यात इमर्सिव्ह व्हिज्युअल्स, मोशन इफेक्ट्स आणि कथाकथनांसह अध्यात्माची सांगड घालून, या आकर्षणाद्वारे एकाच अविस्मरणीय प्रवासातून देशभराची मिनी तीर्थयात्रा पूर्ण करण्याची भावना पुन्हा निर्माण होते. कुटुंबे आणि प्रथमच येणारे अशा दोघांसाठीही हे साई तीर्थमधील सर्वांत आवडते आकर्षण आहे.

२. कथा, ज्योत आणि विश्वास : काळाचा फेरफटका – द्वारकामाई साई तीर्थपासून जवळच असलेली द्वारकामाई हे शिर्डीच्या आध्यात्मिकदृष्ट्या सर्वांत महत्त्वपूर्ण ठिकाणांपैकी एक आहे. साईबाबांनी आपल्या आयुष्याचा बराचसा काळ जिथे घालवला, अशा या पवित्र ठिकाणी अजूनही सतत जळणारी अखंड धुनी (पवित्र अग्नी) आहे. येथील शांत आणि चिंतनशील वातावरणामुळे शिर्डीच्या सखोल आध्यात्मिक



सारतत्त्वाशी जोडले जाण्याची इच्छा असणाऱ्या अभ्यागतांसाठी हा एक सार्थक थांबा ठरतो.

३. साईबाबा मोझॅक – एक विक्रमी कलाकृती इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळालेले साईबाबा मोझॅक हे साई तीर्थमधील सर्वांत अनोख्या वैशिष्ट्यांपैकी एक आहे. चिन्मय प्रभू या युवा कलाकाराने शेकडो रुबिक्स क्यूब्स वापरून तयार केलेली, ही लार्जर दॅन लाइफ कलाकृती सर्जनशीलता आणि भक्ती यांचे सुंदर मिश्रण आहे. चमकदार, डोळ्यांत भरण्याजोगी आणि अत्यंत तपशीलवार अशी ही कलाकृती उद्यानातील सर्वाधिक छायाचित्र घेण्यात आलेल्या आकर्षणांपैकी एक बनली आहे.

४. लेझर शो – जिथे साईबाबांची कहाणी जिवंत होते संध्याकाळ होताच 'साई तीर्थ'चे रूपांतर प्रकाश, ध्वनी आणि कथाकथनाच्या नेत्रदीपक जगात होते. हा इमर्सिव्ह लेझर शो स्तंभित करणारे व्हिज्युअल इफेक्ट्स, संगीत, कथन आणि लार्जर-दॅन-लाइफ प्रोजेक्शनद्वारे साईबाबांचे जीवन आणि शिकवण जिवंत करतो. त्यामुळे अभ्यागतांच्या दृष्टीने भावनिक आणि सिनेमॅटिक अनुभवाची निर्मिती होते. या अनुभवातून कुटुंबे आणि प्रवाशांना संस्मरणीय पद्धतीने शिर्डी भेटीचा समारोप करण्याचा मार्ग सापडतो.

५. सबका मलिक एक – जिथे साईबाबांचा संदेश जिवंत होतो 'सबका मलिक एक' हे साईबाबांचे जीवन, शिकवण आणि तत्त्वज्ञान पडद्यावर साकारणारा एक चित्ताकर्षक सिनेमॅटिक सादरीकरण आहे. पिढ्यान् पिढ्या लाखो लोकांना प्रेरणा देणाऱ्या विश्वास, करुणा, मानवता आणि एकता या कालातीत मूल्यांवर इमर्सिव्ह कथाकथन, प्रभावी व्हिज्युअल आणि भावनिकदृष्ट्या गुंतविणारे प्रसंग यांद्वारे प्रकाश टाकणारा हा अनुभव आहे.

## न्यूयॉर्कमध्ये भारतीय महावाणिज्य दूतांसोबत आ.विवेक कोल्हे यांनी केली चर्चा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार विवेक बिपीनदादा कोल्हे यांनी अमेरिकेतील अभ्यास दौऱ्यादरम्यान न्यूयॉर्क येथील भारतीय वाणिज्य दूतावास, न्यूयॉर्क येथे भारताचे महावाणिज्यदूत बिनय एस.प्रधान यांची भेट घेऊन विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा केली.

या बैठकीत भारत-अमेरिका संबंध अधिक बळकट करण्याच्या संधी, कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ग्रामीण विकासासाठी नव्या संकल्पना, सहकार क्षेत्रातील जागतिक भागीदारी आणि भारतीय सहकारी चळवळीचे जागतिक स्तरावर प्रभावी सादरीकरण यांसारख्या विषयांवर सखोल विचारविनिमय करण्यात आला.आ.विवेक कोल्हे यांनी महाराष्ट्रातील सहकार चळवळीची परंपरा, शेतकरी विकासातील सहकारी संस्थांचे योगदान आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेली चालना याबाबत माहिती दिली.भारतीय सहकार मॉडेलने लाखो शेतकऱ्यांना आर्थिक बळ दिले असून,त्याचा अनुभव आणि यशस्वी प्रयोग जगासमोर



मांडण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी कृषी क्षेत्रातील आधुनिक संशोधन, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, उत्पादनवाढ, मूल्यवर्धन आणि शेतकरी सक्षमीकरणासाठी भारत व अमेरिका यांच्यात ज्ञानविनिमय वाढविण्याबाबतही चर्चा झाली. तसेच ग्रामीण विकास आणि सहकार क्षेत्रातील नव्या उपक्रमांसाठी दोन्ही देशांमधील सहकार्याची व्याप्ती वाढविण्यावर भर देण्यात आला.भारतीय सहकार चळवळीने शेतकरी ग्रामीण अर्थव्यवस्था आणि सामाजिक विकासामध्ये बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका जागतिक स्तरावर अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

भारत आणि अमेरिका यांच्यातील परस्पर सहकार्य, नवकल्पना आणि तंत्रज्ञानाच्या देवाणघेवाणीतून कृषी व सहकार क्षेत्राला नवी दिशा मिळेल,असा विश्वास आ.विवेक कोल्हे यांनी व्यक्त केला.

या भेटीमुळे भारत-अमेरिका संबंध अधिक दृढ होण्यास तसेच कृषी, ग्रामीण विकास आणि सहकार क्षेत्रातील भविष्यातील सहकार्याला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहेत.

## टोका-प्रवरासंगम येथे लोकवर्गणीतून स्मशानभूमीचे नूतनीकरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा : )सुधीर चव्हाण**

नेवासा तालुक्यातील टोका-प्रवरासंगम येथील घटेश्वर मंदिरालगत असलेल्या पारंपरिक स्मशान भूमीचे लोकवर्गणीतून नूतनीकरण करण्यात आले असून, सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालणारा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.यावेळी अंत्यविधी साठी तयार करण्यात आलेल्या रथाचे ही लोकार्पण गुरुवारी होणाऱ्या लोकार्पण कार्यक्रमात करण्यात येणार आहे. स्मशानभूमी नूतनीकरणाच्या कामामध्ये २६÷७५ फूट क्षेत्रातील सीसीटीव्ही यंत्रणा, ५०÷४० फूट शेड, बसण्यासाठी बाकडे तसेच पेव्हिंग ब्लॉक बसविण्याची कामे करण्यात आली आहेत. स्मशानभूमीतील पेव्हिंग ब्लॉकचे काम आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या सहकार्याने पूर्ण करण्यात आले आहे.दरम्यान या उपक्रमासाठी सक्रिय सहभाग घेणारे बी. के.उर्फ भाऊसाहेब चव्हाण व आशाताई चव्हाण यांनी आपल्या ४४ व्या लग्नाच्या वाढदिवसाच्या निमित्त आई-वडील स्वर्गीय सौ. मनकर्णा बाई व स्वर्गीय खंडोजी काशीराम चव्हाण देवळालीप्रवरा तालुका राहुरी यांच्या व स्वर्गीय कौशल्याबाई व स्वर्गीय सखाराम रामचंद्र जाधव (खरवंडी, ता. नेवासा) यांच्या स्मरणार्थ ग्रामपंचायत टोका व ग्रामपंचायत प्रवरासंगम यांना अंत्यविधी रथ भेट देण्याचा निर्णय घेतला आहे.

या उपक्रमाचा लोकार्पण सोहळा गुरुवार, दि. ११ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता घटेश्वर मंदिरामागील स्मशानभूमी परिसरात आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ. संजय कळमकर यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.



या उपक्रमासाठी बी. के. चव्हाण, उदय डावखर यांच्यासह टोका (प्रवरासंगम) परिसरातील ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे.

गावकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाल्याने दोन्ही ग्रामपंचायतींचे सरपंच,उपसरपंच,ग्रामविकास अधिकारी, तलाठी स्मशानभूमी समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून, देणगीदारांचा यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.गावाच्या सामाजिक ऐक्याला बळकटी देणारा व ग्रामविकासाला चालना देणारा हा उपक्रम इतर गावांसाठी ही प्रेरणादायी ठरेल अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.


### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME FIROJ SHAIKH SULTAN SHAIKH (NAME AS PER SCHOOL DOCUMENTS) TO NEW NAME AS FIROJ SULTAN SHAIKH VIDE AADHAR NO.2912 8751 0764

### CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME YASMEEN JAMIL ANWAR SHAIKH (NAME BEFORE MARRIAGE) TO NEW NAME AS YASMIN FIROJ SHAIKH(NAME AFTER MARRIAGE) VIDE AADHAR NO.4618 8923 6788


## बहिणीला सासरी पाठविण्याच्या वादातून मारहाण; तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी,:** बहिणीला सासरी पाठविण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून कोयत्याने हल्ल्याचा प्रयत्न, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत किशोर चंद्रभान बर्डे (वय ३०, रा. ईरिगेशन कॉलनी, मुळानगर, ता. राहुरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या बहिणीला पतीकडून त्रास होत असल्याने ती गेल्या आठ दिवसांपासून माहेरी राहत होती.

७ जून रोजी सायंकाळी ज्योती हिचा पती विजय मच्छिंद्र माळी याने फोन करून तिला सासरी पाठविण्याची मागणी केली. यावरून दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर रात्री सुमारे १० वाजता विजय माळी याच्यासह सर्जेराव मच्छिंद्र माळी व आदिनाथ मच्छिंद्र माळी (रा. खुपटी, ता. नेवासा) हे फिर्यादीच्या घरी आले. ज्योतीला सासरी का पाठवत नाही, यावरून पुन्हा वाद निर्माण झाला.

फिर्यादीनुसार, आरोपींनी किशोर बर्डे, त्यांची बहीण ज्योती आणि आई अलका यांना शिवीगाळ केली. वाद मिटविण्यासाठी पुढे आलेल्या वाल्मिक बर्डे यांच्यावर विजय माळी याने हातातील कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केला. हा वार अडविताना किशोर बर्डे यांच्या डाव्या हाताच्या अंगठ्याला दुखापत झाली.

त्यानंतर आरोपींनी ज्योती हिला खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. भांडण सोडविण्यासाठी आलेले लहु बर्डे व कांचन बर्डे यांनाही धक्काबुक्की व शिवीगाळ करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात विजय माळी, सर्जेराव माळी व आदिनाथ माळी यांच्याविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावून पोबारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वृद्ध महिलेच्या गळ्यातील जवळपास एक लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण दोन दुचाकीस्वारांनी हिसकावून पोबारा केल्याची घटना आठवडी बाजाराच्या दिवशी म्हणजे सोमवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास वैजापूर शहरातील यशवंत कॉलनी भागात घडली. भर दिवसा घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे शहरवासीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी या चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिक करत आहेत. दरम्यान याप्रकरणी मनोरमा काशिनाथ वाणी (६५, रा. यशवंत कॉलनी) दोन अनोळखी व्यक्तींविरुद्ध पोलिसात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, आठ जून रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास त्या राहत्या घराच्या कंपाऊंड गेटच्या बाहेर फुले तोडण्यासाठी आल्या होत्या. फुले तोडत असताना त्यांच्या पाठीमागून काळया रंगाच्या दुचाकीवर तोंडाला पांढरा रुमाल बांधलेले दोघेजण आले व त्यातील मागे बसलेल्या एकाने गळ्यातील गंठण हिसकावून घेतले व डेपो रोडच्या दिशेने पोबारा केला. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ नागरगोजे हे करीत आहेत.

### निधन वार्ता

## दत्तात्रय वर्पे



**लोणी** : संगमनेर तालुक्यातील चिंचपूर येथील दत्तात्रय विठ्ठल वर्पे यांचे वयाच्या ५४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी एक मुलगी दोन मुले, एक बहीण, दोन भाऊ असा परिवार असून रंगनाथ विठ्ठल वर्पे यांचे भाऊ तर अशोक प्रल्हाद शिंदे यांचे सासरे होते.

## सुख-दु:ख ओलांडून पुढे जाणे हाच जीवनाचा मंत्र : ह.भ.प. भास्करगिरी महाराज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** सुख आणि दु:ख या दोन्ही परिस्थितींना सामोरे जात आयुष्यात पुढे वाटचाल करणे आवश्यक आहे. संतांनी दिलेला हा जीवनमूल्यांचा संदेश प्रत्येकाने आचरणात आणावा, असे प्रतिपादन गुरुवर्य ह.भ.प. भास्करगिरी महाराज यांनी केले.

चारधाम आणि बारा ज्योतिर्लिंगांची सुमारे १८ हजार किलोमीटरची सायकल तीर्थयात्रा पूर्ण केलेल्या रामभक्त निखिल मच्छिंद्र दहातोंडे याच्या सत्कार समारंभानिमित्त आयोजित प्रवचनात ते बोलत होते. चांदा येथे झालेल्या या कार्यक्रमात ग्रामस्थांच्या उपस्थितीत निखिल दहातोंडे याचा विशेष सन्मान करण्यात आला.भास्करगिरी महाराज म्हणाले, प्रपंच सांभाळताना परमार्थ, देशकार्य आणि समाजकार्य यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. केवळ संसारात गुंतून न राहता तीर्थयात्रा, वारी आणि आध्यात्मिक साधनेसाठी वेळ देणे आवश्यक आहे. निखिल दहातोंडे याने देवगड येथून आपल्या तीर्थयात्रेला सुरुवात करून ती यशस्वीरित्या पूर्ण केली, ही बाब प्रेरणादायी



असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्याच्या धाडसी कार्याबद्दल आणि यशस्वी प्रवासाबद्दल त्याचे तसेच त्याच्या आई-वडिलांचे अभिनंदन केले.मच्छिंद्र दहातोंडे यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमास अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष संभाजीराव दहातोंडे, सरपंच रावसाहेब दहातोंडे, माजी सरपंच डॉ. विकास दहातोंडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, संत-महंत आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. देविदास महाराज आडभाई यांनी केले. सूत्रसंचालन संभाजी गवळी यांनी तर आभार प्रदर्शन मच्छिंद्र दहातोंडे व कल्पना दहातोंडे यांनी केले. यावेळी महिला भगिनींसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रामभक्त निखिल दहातोंडे याचे अभिनंदन केले.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि . १० जून २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>३७७ | ७-२ | १२९<br>५३०<br>११० | जोड<br>७३-५२-१०-४८-२९ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| २४०<br>२६८<br>२२२ | ६-७ | १६०<br>२५०<br>७०० | जोड<br>६९-०७-२१-४८-७९ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४०<br>२३०<br>७८० | ५-६ | १५०<br>१६९<br>६०० | जोड<br>५९-१६-३२-८०-६४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 | 2 | | 2 | 1 | | 8 | 5 | | 8 | 2 | | 1 | 3 | | 1 |
| To | 3 | 16 | 4 | 6 | 56 | 8 | 7 | 05 | 8 | 4 | 43 | 4 | 3 | 09 | 3 |
| 13/03/2026 | 6 | | 0 | 8 | | 0 | 8 | | 9 | 8 | | 8 | 4 | | 5 |
| 16/03/2026 | 4 | | 8 | 2 | | 3 | 4 | | 4 | 1 | | 1 | 6 | | 3 |
| to | 5 | 56 | 9 | 0 | 21 | 8 | 6 | 02 | 9 | 2 | 02 | 3 | 7 | 38 | 7 |
| 20/03/2026 | 6 | | 9 | 0 | | 0 | 0 | | 9 | 7 | | 8 | 0 | | 8 |
| 23/03/2026 | 6 | | 3 | 4 | | 1 | 5 | | 7 | 1 | | 2 | 3 | | 1 |
| to | 8 | 34 | 5 | 5 | 46 | 7 | 6 | 03 | 8 | 3 | 46 | 4 | 3 | 64 | 6 |
| 27/03/2026 | 9 | | 6 | 5 | | 8 | 9 | | 8 | 0 | | 0 | 0 | | 7 |
| 30/03/2026 | 2 | | 1 | 1 | | 1 | 2 | | 1 | 1 | | 1 | 1 | | 2 |
| to | 8 | 90 | 3 | 3 | 87 | 6 | 7 | 97 | 1 | 1 | 12 | 5 | 6 | 66 | 5 |
| 03/04/2026 | 9 | | 6 | 4 | | 0 | 0 | | 9 | 9 | | 6 | 9 | | 9 |
| 06/04/2026 | 1 | | 2 | 1 | | 7 | 1 | | 4 | 3 | | 1 | 1 | | 4 |
| to | 3 | 70 | 2 | 4 | 02 | 7 | 3 | 98 | 7 | 5 | 82 | 5 | 2 | 78 | 6 |
| 10/04/2026 | 3 | | 6 | 5 | | 8 | 5 | | 7 | 0 | | 6 | 4 | | 8 |
| 13/04/2026 | 5 | | 1 | 1 | | 6 | 2 | | 5 | 1 | | 8 | 2 | | 1 |
| to | 6 | 06 | 5 | 4 | 43 | 7 | 3 | 45 | 0 | 3 | 77 | 9 | 6 | 85 | 4 |
| 17/04/2026 | 9 | | 0 | 9 | | 0 | 9 | | 0 | 3 | | 0 | 0 | | 0 |
| 20/04/2026 | 5 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 3 | 5 | | 3 | 3 | | 3 |
| to | 7 | 00 | 2 | 8 | 58 | 5 | 2 | 53 | 5 | 5 | 71 | 8 | 4 | 68 | 7 |
| 24/04/2026 | 8 | | 7 | 9 | | 9 | 2 | | 5 | 7 | | 0 | 9 | | 8 |
| 27/04/2026 | 3 | | 1 | 4 | | 7 | 1 | | 1 | 6 | | 1 | 6 | | 2 |
| to | 5 | 63 | 2 | 4 | 85 | 8 | 6 | 71 | 2 | 7 | 29 | 9 | 8 | 27 | 5 |
| 01/05/2026 | 8 | | 0 | 0 | | 0 | 0 | | 8 | 9 | | 9 | 8 | | 0 |
| 04/05/2026 | 1 | | 3 | 1 | | 6 | 2 | | 2 | 2 | | 2 | 2 | | 2 |
| to | 7 | 71 | 9 | 4 | 34 | 8 | 3 | 48 | 7 | 4 | 25 | 5 | 4 | 66 | 5 |
| 08/05/2026 | 9 | | 9 | 8 | | 0 | 9 | | 9 | 6 | | 8 | 0 | | 9 |
| 11/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 2 | 6 | | 2 | 1 | | 1 | 4 | | 1 |
| to | 6 | 79 | 7 | 7 | 04 | 3 | 0 | 68 | 3 | 9 | 01 | 2 | 7 | 85 | 5 |
| 15/05/2026 | 6 | | 0 | 0 | | 9 | 0 | | 3 | 0 | | 8 | 7 | | 9 |
| 18/05/2026 | 8 | | 4 | 5 | | 1 | 1 | | 1 | 7 | | 4 | 2 | | 2 |
| to | 9 | 79 | 5 | 6 | 96 | 7 | 4 | 22 | 2 | 8 | 30 | 8 | 8 | 93 | 5 |
| 22/05/2026 | 0 | | 0 | 8 | | 8 | 7 | | 9 | 8 | | 8 | 9 | | 6 |
| 25/05/2026 | 5 | | 2 | 3 | | 1 | 8 | | 4 | 1 | | 2 | 4 | | 5 |
| to | 6 | 11 | 9 | 4 | 37 | 3 | 9 | 78 | 6 | 9 | 05 | 5 | 6 | 06 | 5 |
| 29/05/2026 | 0 | | 0 | 6 | | 3 | 0 | | 8 | 0 | | 8 | 0 | | 6 |
| 01/06/2026 | 4 | | 1 | 9 | | 1 | 2 | | 5 | 1 | | | | | |
| to | 4 | 89 | 3 | 9 | 80 | 2 | 6 | 82 | 7 | 2 | 1 | | | | |
| 05/06/2026 | 0 | | 5 | 0 | | 7 | 0 | | 0 | 8 | | | | | |

## द • ख • ल

### कन्यारत्नाच्या आगमनाचे वृक्षारोपणाने स्वागत



**अहिल्यानगर :** समाजात मुलीच्या जन्माचे विविध प्रकारे स्वागत केले जाते. मात्र, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मुलीच्या जन्माचा आनंद वृक्षारोपणाद्वारे साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम शहरातील पवार कुटुंबीयांनी राबविला आहे. घरात कन्यारत्नाचे आगमन झाल्यानंतर तिच्या नावाने रोपाची लागवड करून त्याचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमातून मुलींचा सन्मान आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही मूल्यांचा सुंदर संगम घडवून आणण्यात आला. निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्ष लतिका पवार यांची नात तसेच इंजि. प्रसाद पवार व प्रांजल पवार या दाम्पत्यांना नुकतेच कन्यारत्न प्राप्त झाले. कुटुंबात नव्या पाहुणीच्या आगमनाने आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या आनंदाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत कुटुंबीयांनी वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबविला. आजचे रोप उद्याचा श्वास' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांतर्गत कन्येच्या नावाने रोप लावण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता त्या रोपाचे नियमित संगोपन, संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारीही कुटुंबीयांनी स्वीकारली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे झपाट्याने कमी होत असलेले हरित क्षेत्र, वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि तापमानवाढ या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### नेप्तीत सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरासाठी ग्रामस्थांचा प्रशासनाकडे एल्गार



**अहिल्यानगर :** नेप्ती गावाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असून गावाचा विस्तारही मोठ्या प्रमाणावर होत आहे. गावामध्ये शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणे तसेच विविध सामाजिक उपक्रम सातत्याने वाढत आहेत. मात्र या वाढत्या वर्दळीच्या पार्श्वभूमीवर गावाच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. त्यामुळे गावातील प्रमुख चौक, रस्ते, शाळांच्या परिसरात तसेच सार्वजनिक ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे तातडीने बसवावेत, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते अमोल चौगुले व रामदास फुले यांनी ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ यांच्याकडे केली. यावेळी माजी उपसरपंच जालिंदर शिंदे ,ज्ञानेश्वर जपकर, सोसायटी सदस्य सुरेश कदम, विष्णू गुंजाळ, रामदास कोल्हापूरे, बापू साळवे ,हनुमंत साळवे , सोमनाथ ठुबे, शिवम पवार व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी ग्रामसेवकाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की ,सीसीटीव्ही यंत्रणा उभारल्यास गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे.गावामध्ये अनेक शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी दररोज ये-जा करत असतात. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा असून शाळा सुटल्यानंतर किंवा सकाळच्या वेळेत अनेक ठिकाणी गर्दी होत असते. अशा परिस्थितीत सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य होईल. विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. कोणतीही अनुचित घटना घडल्यास संबंधित व्यक्तींची ओळख पटविणे आणि तपास करणे अधिक सुलभ होईल.

### मी सावित्रीची लेक विद्यार्थिनींना पुरस्कार

**अहिल्यानगर :** मधील स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम,श्रमीकनगर,अहिल्यानगर.यांच्या वतीने दरवर्षी मी सावित्रीची लेक पुरस्कार १० वी, आणि १२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यर्थिनींना दिला जातो,दिवंगत विठ्ठल बुलबुले सर यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. तरी मार्च२०२६च्या परीक्षेत ज्या मुलींना १० वी, आणि१२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या आहेत.त्यांना मी सावित्रीची लेक पुरस्कार पुरस्कार दिला जाणार आहे.त्यासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मार्कशीट झेरॉक्स,आधार कार्ड झेरॉक्स,१ पासपोर्ट फोटो( फोटोला स्टेपलर पीन मारू नये), मोबाईल नंबर हे पुरस्कारासाठी लागणारे कागदपत्रे खालील पत्यावर पाठवावीत. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय करणाऱ्या मुली व महिला साठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे यासाठी इच्छुकांनी प्रस्ताव पाठवावेत, सर्व देणगीदार यांच्या सहकार्यातून व सर्व सभासद यांच्या परिश्रमातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात तरी अधिक माहिती साठी संपर्क स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम,अहिल्यानगर,श्रमीकनगर, सावेडी.

# कचरा हटवायला आलेल्या मनपाच्या पथकालाच विरोध

## स्वच्छता मोहीम तासभर खोळंबली!

## दोन महिन्यांनंतर मनपा कामाला जेसीबी-डंपर अडविल्याचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** हनुमान नगर परिसरातील कचरा, झाडांच्या फांद्या आणि हिरवा कचरा हटविण्यासाठी सोमवारी आलेल्या महानगरपालिकेच्या स्वच्छता पथकाला काही स्थानिकांकडून विरोध झाल्याने स्वच्छता मोहीम सुमारे एक तास खोळंबल्याची घटना घडली. कर्मचाऱ्यांशी वाद घालत जेसीबी व डंपरच्या कामात अडथळा आणल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकाराची परिसरात चांगलीच चर्चा रंगली होती.

हनुमान नगर परिसरातील नागरिकांनी रस्त्यालगत पडून असलेल्या झाडांच्या फांद्या, हिरवा कचरा आणि अस्वच्छतेबाबत महानगरपालिकेकडे लेखी तक्रार केली होती. मात्र, या तक्रारीनंतरही सुमारे दोन महिने कचरा जागेवरच पडून होता. अखेर महानगरपालिकेने सोमवारी जेसीबी व डंपरच्या सहाय्याने परिसरातील कचरा हटविण्याचे काम सुरू केले.

मात्र, प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम सुरू असतानाच काही नागरिकांनी वाहनांसमोर उभे राहत कामाला विरोध केल्याचे सांगितले जात आहे. यावेळी मनपा कर्मचाऱ्यांशी शाब्दिक वाद झाल्याची माहिती समोर आली. तसेच जेसीबी व डंपरच्या हालचाली रोखण्यात आल्याने स्वच्छतेचे काम सुमारे एक तास ठप्प राहिल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

विशेष म्हणजे, ज्या कचऱ्याबाबत वारंवार तक्रारी करण्यात आल्या, त्याच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाची यंत्रणा कामाला लागल्यानंतर विरोधाची भूमिका घेतली गेल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. सार्वजनिक आरोग्याशी संबंधित कामात अडथळा निर्माण झाल्याने अनेक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, संपूर्ण घटनेचे चित्रीकरण झाल्याची माहिती समोर आली असून, या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली. स्वच्छता मोहिमेदरम्यान झालेल्या वादामुळे सार्वजनिक कामकाजावर परिणाम होत असल्याच्या प्रतिक्रिया परिसरातून व्यक्त करण्यात आल्या.

**स्वच्छतेची मागणीही, विरोधही!**

हनुमान नगर परिसरातील कचरा आणि झाडांच्या फांद्यांबाबत नागरिकांनी दोन महिन्यांपूर्वी तक्रार केली होती. दीर्घ प्रतीक्षेनंतर महानगरपालिकेने जेसीबी, डंपर आणि स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने कचरा हटविण्याचे काम सुरू केले. मात्र, त्याच कामादरम्यान निर्माण झालेल्या वादामुळे मोहीम काही काळासाठी ठप्प झाली. त्यामुळे स्वच्छतेची मागणी आणि स्वच्छतेलाच विरोध? असा सवाल परिसरातील नागरिकांनी उपस्थित केला.

**वादातही कर्तव्याला प्राधान्य**

कचरा हटविताना निर्माण झालेल्या वादामुळे काही काळ काम ठप्प झाले असले, तरी महानगरपालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी संयम राखत आपले कर्तव्य पार पाडले. जेसीबी व डंपरच्या सहाय्याने परिसर स्वच्छ करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे अनेक नागरिकांनी स्वागत केले.



हनुमान नगर परिसरात सोमवारी झाडांच्या फांद्या व साचलेला कचरा हटविताना महानगरपालिकेचे स्वच्छता पथक.

# श्री गजानन महाराज मंदिर हे सामाजिक एकात्मतेचे केंद्र : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** मंदिरे ही केवळ श्रद्धेची केंद्रे नसून समाजाला एकत्र आणणारी, विचारांची देवाण-घेवाण घडवून आणणारी आणि सकारात्मकतेची ऊर्जा देणारी पवित्र स्थळे आहेत. श्री गजानन महाराज मंदिरात आल्यानंतर मन प्रसन्न होते, चांगल्या विचारांची प्रेरणा मिळते आणि समाजसेवेची उर्मी निर्माण होते. त्यामुळेच केडगाव भूषण नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम अधिक सुसज्ज पद्धतीने पार पडावेत यासाठी सभामंडपाचे काम मंजूर करण्यात आले असून त्याचे भूमिपूजन आज उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

केडगाव भूषण नगर येथील श्री गजानन महाराज मंदिरात आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून उभारण्यात येणाऱ्या सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन माजी प्राचार्य शरद कोलते यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी आ. संग्राम जगताप, नगरसेवक विजय मोहिते, संभाजी पवार, विकी वाघ, गणेश कुंभारे, सचिन गोळे, डॉ. दत्तात्रेय लोडे, अनिल डुमणे, मिलिंद वडाळकर, शंकर खोमणे, विजय कुदळे, आनंद किनोर, डॉ. निलेश बकाल, अनिल साळवे, श्रीकृष्ण भसले, उत्तम सराफ, विजय पडोळे, स्नेहा पटेल, स्वाती वडाळकर, सागर कोकणे, तुळशीराम जाधव, नंदकिशोर आठरे भाविक व नागरिक उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, विदर्भ मित्र मंडळाच्या माध्यमातून श्री गजानन महाराज मंदिराची अत्यंत भक्तिभावाने सेवा केली जात आहे. प्रत्येकाने सकारात्मक विचार आणि सकारात्मक ऊर्जा घेऊन काम केल्यास यश निश्चित मिळते. मंदिर परिसरातील धार्मिक वातावरण समाजाला योग्य दिशा देणारे आहे.

## वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज

# हरित अहिल्यानगरसाठी लोकचळवळ उभारणार : बारस्कर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी शेकडो वर्षांपूर्वी वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे हा अमूल्य संदेश देत वृक्षांचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविले. मानव, निसर्ग आणि पर्यावरण यांच्यातील अतूट नाते अधोरेखित करणारा हा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत आहे. वाढते प्रदूषण, कमी होत चाललेले हरित क्षेत्र, बदलते ऋतुमान आणि वाढते तापमान यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास दिवसेंदिवस अधिक गंभीर होत असून त्याचा थेट परिणाम मानवी आरोग्यावर होताना दिसत आहे.

याच पार्श्वभूमीवर पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची व्यापक लोकचळवळ उभी करण्याची गरज निर्माण झाली आहे. आ. जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षवल्ली आम्हा सोयरे हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवत 'एक कुटुंब - एक झाड' हा संकल्प साकारण्यासाठी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांना मोफत फळझाडे आणि देसी वृक्षांचे वाटप केले जाणार आहे. या माध्यमातून हरित अहिल्यानगर घडविण्याचा संकल्प करण्यात आल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले. आ. जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त तपोवन रोड येथील लक्ष्मीनगर परिसरात वृक्षारोपण करून हरित अहिल्यानगर संकल्प अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस गणेश बोरुडे, दिनेश खेडकर, दीपक गायकवाड, पारस गायकवाड, प्रदीप कारले, प्रदीप बोराडे, हरिभाऊ रायकर, गणेश मरकड, योगेश माळी, जपे मेजर, म्हस्के मेजर, महेश डुकळे, कुलदीप केंद्रे, अंबादास जिदम, दत्ता दातीर, संतोष कोठारे, संजय पादीर, देविदास ससे, संतोष रच्चा, रेववनाथ सोमवंशी, सत्यप्रेम गिरी, भाऊसाहेब सांगळे, विठ्ठल गंगार्ड, देवा ब्राह्मणकर, गणेश केदारी यांच्यासह नागरिक संख्येने उपस्थित होते.

# बोरुडेंच्या प्रयत्नांतून ११६० अंधांना मिळाली नवदृष्टी!

## आता गरजूंकरिता 'फिनिक्स नेत्रालय' उभारण्याचे स्वप्न

## नागरदेवळेच्या मातीतून उगवली 'दृष्टीदान' क्रांती!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** एका छोट्याशा गावातून सुरू झालेली चळवळ आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश पेरत आहे. नगर तालुक्यातील नागरदेवळे येथील जालिंदर बोरुडे यांनी सामाजिक बांधिलकीतून सुरू केलेली नेत्रदान चळवळ आज अनेकांसाठी आशेचा किरण ठरली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या फिनिक्स सोशल फौंडेशनने मरणोत्तर नेत्रदानाच्या माध्यमातून तब्बल ११६० दृष्टीहीन व्यक्तींना नवदृष्टी मिळवून दिली आहे.

'नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान' या ब्रीदवाक्याने प्रेरित होऊन गेली तीन दशके सुरू असलेले हे कार्य आज राज्यभरात आदराने पाहिले जाते. फिनिक्स सोशल फौंडेशनच्या माध्यमातून केवळ नेत्रदान जागृतीच नव्हे, तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे मोठे जाळे उभे करण्यात आले आहे.

जलसंपदा विभागात टेलिफोन ऑपरेटर म्हणून कार्यरत असताना जालिंदर बोरुडे यांच्या मनात समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा निर्माण झाली. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या कार्यातून प्रेरणा घेत त्यांनी १९९१ मध्ये फिनिक्स फाऊंडेशनची स्थापना केली. सुरुवातीला नेत्रदान क्षेत्रात काम करण्याचा कोणताही ठराविक विचार नव्हता. मात्र विडी कामगार, हमाल, बांधकाम मजूर, शेतकरी, कष्टकरी, महिला आणि गरीब घटकांमधील दृष्टीदोषाच्या समस्या पाहून त्यांनी या क्षेत्रात काम करण्याचा निर्धार केला. त्यानंतर सुरू झालेला प्रवास आज हजारो कुटुंबांच्या आयुष्यात प्रकाश आणणारा ठरला आहे.

फिनिक्स फाऊंडेशनच्या माध्यमातून दरमहा जिल्ह्यातील विविध भागांत मोफत नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरे आयोजित केली जातात. नागरदेवळे, पारनेर, शेवगाव, नेवासा, पाथर्डी तसेच नगर शहरात नियमितपणे ही शिबिरे भरविली जातात. विशेष म्हणजे, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेला नागरदेवळे येथे आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिराचा लाभ राज्यातील विविध जिल्ह्यातून येणारे अनेक गरजू रुग्ण घेत आहेत. आतापर्यंत सुमारे ३ लाख ९७ हजार ४४७ रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली असून हजारो नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. समाजकार्यात अनेकदा अडथळे येतात. घरचं खाऊन कशाला लष्कराच्या भाकऱ्या भाजता? अशा स्वरूपाचे टोमणेही जालिंदर बोरुडे यांना अनेकदा ऐकावे लागले.


## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- **मदिना अहमद शेख रा. पुनतगांव ता. नेवासा** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **मदिना अहमद शेख** रा. पुनतंगाव यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मदिना अहमद शेख | पुनतंगाव | ०१/०६/१९६१ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- **रज्जाक गुलाबमोहिद्दीन सय्यद राहणार नांदुरखी तालुका राहता** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **गुलशन रज्जाक सय्यद राहणार पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | गुलशन रज्जाक सय्यद | पुनतंगाव | १५/११/१९७८ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-**कमरअली यासीन शहा रा. सांगवी तालुका गंगापूर** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **जावेद कमरअली शहा राहणार पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | जावेद कमरअली शहा | पुनतंगाव | १२/०२/१९९७ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-**कमरअली यासीन शहा रा. सांगवी तालुका गंगापूर** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **आफरिन कमरअली शहा राहणार पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | आफरिन कमरअली शहा | पुनतंगाव | ०३/११/१९९४ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-**कमरअली यासीन शहा रा. सांगवी तालुका गंगापूर** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **परविन कमरअली शहा राहणार पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | परविन कमरअली शहा | पुनतंगाव | १३/०६/१९९० |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- **रज्जाक गुलाबमोहिद्दीन सय्यद राहणार नांदुरखी तालुका राहता** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **फरीदा रज्जाक सय्यद पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | फरीदा रज्जाक सय्यद | पुनतंगाव | ११/०६/१९८३ |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

**तहसिल कार्यालय नेवासा**
क्रमांक:/जन्म-मृत्यु/एसआर४१/२०२६
नेवासा दिनांक. २२/०५/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-**रज्जाक गुलाबमोहिद्दीन सय्यद राहणार नांदुरखी तालुका राहता** यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम./कु. **जहीरअब्बास रज्जाक सय्यद पुनतगाव** यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

**सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.**

| अ.क्र. | जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव | गावाचे नाव | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | जहीरअब्बास रज्जाक सय्यद | पुनतंगाव | ०१/०६/१९८० |

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

सही/-
**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# द•ख•ल

## 'या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट' कवितासंग्रहाचे प्रकाशन उत्साहात

**पुणे :** कवी नैनेश तांबे यांच्या 'या शहरानं दिलेलं रिटर्न गिफ्ट' या कवितासंग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर नैनेश तांबे यांच्या आई-वडिलांच्या हस्ते कवितासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. प्रास्ताविकात नितीन शिंदे यांनी पञुस्तकाच्या प्रवासाविषयी माहिती दिली, तर प्रकाशक अमृता तांदळे यांनी पुस्तकाचे साहित्यिक महत्त्व स्पष्ट केले. प्रमुख पाहुणे अपूर्व राजपूत, डॉ.स्वप्निल चौधरी, सारंग पांपटवार व अभि मुंढे यांनी नैनेश यांच्या कवितेतील सामाजिक भान, संवेदनशीलता आणि माणूसपणावर भाष्य केले. यावेळी नैनेश यांचे वडील संतोष तांबे यांचे मनोगत उपस्थितांना भावूक करून गेले. मनोगतात कवी नैनेश तांबे यांनी उपस्थितांचे आभार मानत आपल्या काव्यप्रवासातील भावना व्यक्त केल्या. अध्यक्षीय समारोपात सुरेशकुमार वैराळकर (अण्णा) यांनी नव्या पिढीच्या साहित्यिक जाणीवांचा गौरव केला.



## शिरूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकपदी विनोद पाटील



**तळेगाव ढमढेरे :** शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांची प्रशासकीय बदली अंतर्गत आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात बदली झाली असल्याने शिरुर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक पदी विनोद पाटील यांची नेमणूक करण्यात आली असून विनोद पाटील यांनी पोलीस स्टेशनचे सूत्रे हाती घेतली आहे. शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे दोन वर्षांपूर्वी शिरूर पोलीस स्टेशन ला रुजू झालेले असताना त्यांनी विविध संवेदनशील प्रकरणांचा तपास करत जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुका शांततापूर्ण वातावरणात पार पाडत कायदा सुव्यवस्थेचे प्रभावी व्यवस्थापन चोख पार पाडले असून संदेश केंजळे यांनी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहिमा राबवू अवैध व्यवसायांविरोधात कारवाया करुन वाहतूक नियोजन केलें नुकतेच यांची बदली आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागात झाल्यानंतर शिरुर पोलीस स्टेशनचा पदभार पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्याकडे सोपवण्यात आला असून त्यांनी शिरुर पोलीस स्टेशनचा पदभार स्वीकारला आहे. विनोद पाटील यांनी यापूर्वी मुंबईमध्ये कर्तव्य बजावले असून त्यांची प्रशासकीय कामकाजातील कौशल्य आणि कायदा सुव्यवस्था राखण्याबाबत मोठी ओळख असून शिरुर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये त्यांच्या अनुभवाचा फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## कोंढापुरी येथे 'माझं गाव आरोग्यसंपन्न गाव' उपक्रमाची बैठक

**तळेगाव ढमढेरे :** कोंढापुरी (ता. शिरुर) येथे माझं गाव आरोग्य संपन्न गाव या उपक्रमांतर्गत आरोग्य समितीची बैठक नुकतीच संपन्न झाली असून सदर उपक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे सर्वानुमते ठरले आहे. कोंढापुरी (ता. शिरुर) येथे माझं गाव आरोग्य संपन्न गाव या उपक्रमाबाबत नुकतीच बैठक संपन्न झाली. यावेळी सदर उपक्रमा अंतर्गत जून महिन्यात घरोघरी जावून कंटेनर सर्व्हे करणे त्यामुळे होणारे आजार टाळणे, पाणी शुद्धीकरण करणे, रासायनिक, जैविक पाणी नमुने तपासणीसाठी पाठविणे, किशोरवयीन मुली व महिलांची हिमोग्लोबिन तपासणी करणे, योगशिबिराचे आयोजन करणे, अंगणवाडी सेविकांना सकस आहाराचे प्रात्यक्षिक दाखविणे व महत्व पटवून देणे, प्राथमिक शाळा व हायस्कूल मधील किशोरवयीन मुलांना स्वच्छतेचे महत्व पटवून सांगणे, मोतिबिंदू शिबिर आयोजित करणे या विषयांवर चर्चा करून तातडीने अंमलबजावणी करण्याचे ठरले. यावेळी सरपंच संदीप डोमाळे, उपसरपंच सुषमा गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य सुनिल गायकवाड, आरोग्य सहाय्यक अशोक गायकवाड, आरोग्य सेविका कोकिळा कराळे, आरोग्यसेवक अमोल गायकवाड, विजय ढमढेरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष मधुकर गायकवाड, पोलीस पाटील राजेश गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी राजाराम रासकर यांसह आदी उपस्थितीत होते. आरोग्य सहाय्यक अशोक गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले.



कोंढापुरी (ता. शिरुर) येथे माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव उपक्रमांतर्गत आयोजित बैठकीस उपस्थित मान्यवर.(छायाचित्र आकाश भोरडे)

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग, विद्यार्थी सुसंवादासाठी व्यासपीठ

## दोन व तीन टप्प्यांतील परीक्षेच्या प्रक्रिया ६ महिने व ११ महिन्यात पूर्ण करण्यासाठी आयोग सकारात्मक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षा पद्धतीत तातडीने सुधारणा करावी आणि स्पर्धा परीक्षार्थींच्या विविध प्रलंबित व न्याय्य मागण्यांची अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी शिवसेना नेत्या व आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आज आयोगाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या बैठकीत महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि विद्यार्थ्यांमध्ये थेट सुसंवाद प्रस्थापित करण्यासाठी एक विद्यार्थी व्यासपीठ ' सुरू करण्याची आवश्यकता डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केली, ज्यावर आयोगाने सहकार्याचे सकारात्मक आश्वासन दिले आहे.

डॉ.गोऱ्हे यांनी एमपीएससी कार्यालयाला मंगळवारी (ता. ९) प्रत्यक्ष भेट देऊन आयोगाचे अध्यक्ष श्री. विवेक भीमनवार, सचिव श्री. महेंद्र हरपाळकर आणि परीक्षा नियंत्रक सरिता बांदेकर-देशमुख यांच्याशी विद्यार्थ्यांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा केली आणि त्यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले. याप्रसंगी महेश बडे व रवींद्र बारस्कर आदी मान्यवर





उपस्थित होते.

बैठकी दरम्यान डॉ. गोऱ्हे यांनी सुचविले कि परीक्षांच्या तारखा ऐनवेळी बदलण्याऐवजी, त्यांचे अचूक पूर्वनियोजन करून त्या वेळेतच जाहीर कराव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही. जिल्हा स्तरावर आयोगाची स्वतःची हक्काची परीक्षा केंद्रे सुरू करण्यासाठी शासन स्तरावर विशेष पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना आणि तांत्रिक अडचणींना तत्काळ उत्तरे मिळण्यासाठी 'ऋअट' आधारित स्वयंचलित उत्तर व्यवस्था (औांरींशव ठशीिेपीश ड्रीींशा) विकसित करावी. यासोबतच २४७ हेल्पडेस्क, डिजिटल तक्रार निवारण व्यवस्था आणि आयोगाचे स्वतंत्र मोबाईल ॲप सुरू करून तंत्रज्ञानाचा वापर वाढवावा, ज्यामुळे दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल.

महिला परीक्षार्थींचा संवेदनशीलतेने विचार करून, महिला उमेदवारांना प्रसूती काळात विशेष सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी डॉ. गोऱ्हे यांनी केली. दिव्यांग उमेदवारांसाठीच्या सवलती आणि अटींमध्ये योग्य सुधारणा करण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.

प्रलंबित परीक्षांच्या तारखा तातडीने घोषित करून संपूर्ण भरती प्रक्रिया १ वर्षाच्या कालबद्ध मर्यादेत पूर्ण करावी.

**राज्य सरकारसमवेत चर्चा करून पाठपुरावा करणार :**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर स्पर्धा परीक्षांमधील विलंब आणि अनिश्चिततेमुळे मोठा मानसिक व आर्थिक ताण येत आहे. या बैठकीत उपस्थित केलेल्या सर्व धोरणात्मक मुद्द्यांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत विशेष चर्चा करून शासन स्तरावर याचा गतीने पाठपुरावा केला जाईल, असे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना सांगितले.

आ डॉ. गोऱ्हे यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांचा सविस्तर विचार करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, तसेच दोन व तीन टप्प्यांतील परीक्षेच्या प्रक्रिया ६ महिने व ११ महिन्यात पूर्ण करण्यात येतील असे आयोगाच्या अध्यक्षांनी व सचिवांनी या बैठकीत सांगितले.

**निवेदनातील अन्य प्रमुख मागण्या:**

- 'एक उमेदवार, एक पद' धोरणाची तातडीने व प्रभावी अंमलबजावणी व्हावी, जेणेकरून जागा वाया जाणार नाहीत.
- प्रतीक्षा यादी (थरळींळपस ङळीीं) पद्धतीमध्ये अधिक पारदर्शकता आणली जावी.
- गट-क (ऋर्ऑी उि) परीक्षांची नवीन व सुधारित योजना त्वरित जाहीर करावी.
- पोलीस उपनिरीक्षक (झडख) पदाची मुख्य परीक्षा स्वतंत्रपणे घेण्यात यावी.
- पूर्व - मुख्य आणि मुलाखत या तीन टप्प्यातील प्रक्रिया ११ महिन्यात पूर्ण करण्यात येईल व ज्या पूर्व - मुख्य या दोन टप्प्यातील प्रक्रिया आहेत त्या ६ महिन्यात पूर्ण कराव्यात.

## नवोदित लेखिका पावनी जगताप यांच्या ' यूं हसी वादीयां ' पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरची केवळ पर्यटन किंवा मनाला भुरळ घालणारा निसर्गसौंदर्य इतकीच सीमित कल्पना न ठेवता तेथील लोकांचे जीवनमान, भौगोलिक स्थिती, संरक्षण पद्धती, विचारधारा याचे बारकाईने निरीक्षण करून ते शब्दबद्ध केलेल्या ''यूं हसी वादीयां'' या सासवड येथील युवा लेखिका पावणी दिनेश जगताप यांच्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले

सासवडच्या शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूलच्या स्व चंदूकाका जगताप सभागृहात झालेल्या या सोहळ्यास मानद उपचारक डॉ वैजयंती नगरकर अध्यक्ष म्हणून तर शिवाजी स्कूलच्या प्राचार्या रेणुकासिंह मर्चेन्ट, प्रकाशक अरुण चिंचकर व पुरंदर नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक अनिल उरवणे प्रमुख पाहुणे म्हणून हजर होते.

दिप प्रज्वलन व सुवर्णा होले यांच्या ए कौन चित्रकार है या गीताने कार्यक्रमाची सुरवात झाली.गौरी प्रभुणे, हृदया जगताप व अनिल कदम यांनी पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन केले. डॉ दिनेश जगताप यांनी प्रास्तविक केले तर शिल्पा हेंद्रे व सुनील हेंद्रे



यांनी सर्वांचे स्वागत केले. याच कार्यक्रमात पावणी जगताप व तिच्या परिवाराकडून

वेगवेगळ्या क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या सतीश पाटील, राजेंद्र गिरमे व अमोल बागडे यांचा मानपत्र, शाल श्रीफळ, स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.संजय काटकर यांनी पाहुण्यांचा परिचय तर मोहन बागडे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले.सचिन घोलप सर यांनी सुंदर सूत्रसंचालन केले व अनिल कदम यांनी आभार मानले

लेखिका पावणी जगताप, प्रकाशक अरुण चिंचकर,प्रा रेणुकासिंह मर्चेन्ट, डॉ वैजयंती नगरकर यांनी यावेळी मनोगते मांडली. काश्मीरची आपल्या मनातील इमेज थोडी बदलण्याचा हा प्रयत्न आहे असे पावनी हिने सांगत जगणं आणि जिवंत असणं यात सूक्ष्म काही आहे ते वेचता आले पाहिजे असा विचार मांडला.माझ्या पुस्तकाने कोणाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेत अगदी कमी वयात पावनी ने उत्तुंग भरारी घेतल्याचे रेणुकासिंह यांनी सांगितले. उत्तम मानसोपचार तज्ज्ञ असणाऱ्या डॉ नगरकर यांनी मुले व पालक यांच्या नात्याचा सुंदर विचार व्यक्त केला. पालकांनी मुलांना पंख द्यावेत भरारी त्यांना घेऊ द्या असा सल्ला त्यांनी देत पावनी हिच्या कर्तृत्वाचे अभिनंदन केले. जीवन आनंदी आहे तो आघात समजू नका असेही त्यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. संतोष जगताप, स्नेहल देशपांडे, वामन जगताप,तानाजी सातव,बाळासाहेब भिंताडे,वर्षा साबळे,रेश्मा कामठे, आबा बागडे, सुनील मेमाणे, संतोष शेंडकर, प्रा सुभाष तळेकर, डॉ प्रज्ञा देशमुख, सोमनाथ भोंगळे, मेनका जगताप, स्वाती थिटे अभिजित धुमाळ,रोहित खामकर, अश्विनी मोरे, रणजित गायकवाड, संजय प्रभुणे यांसह अनेक साहित्यप्रेमी यावेळी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** पुरंदर तालुक्यातील इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार व गौरव समारंभ आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर व आचार्य अत्रे शिक्षक व शिक्षकेतर सेवक पतपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. ७ जून रोजी सासवड येथील आचार्य अत्रे प्रतिष्ठानचे सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे होते, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजयराव कोलते यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. पुरंदर तालुक्यातील ६५ माध्यमिक विद्यालयांपैकी बहुसंख्य शाळांतील उच्च श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनी, त्यांचे शिक्षक व पालक मोठ्या संख्येने या कौतुक सोहळ्यास उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करण्याबरोबरच त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरणा देण्याचा हेतू या कार्यक्रमामागे होता. कार्यक्रमाच्या प्रारंभी पतसंस्थेचे अध्यक्ष शांताराम कोलते यांनी उपस्थितांचे स्वागत केले, तर वसंतराव ताकवले यांनी प्रास्ताविकातून उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी अनेक





गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून यशाचे श्रेय शिक्षक, पालक व विद्यालयांना देत कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षणाबरोबरच संस्कारांची जपणूक करणाऱ्या शाळांमुळेच हे यश प्राप्त झाल्याचे त्यांनी नमूद केले.या प्रसंगी बाळासाहेब मुळीक, राष्ट्रपती पारितोषिक विजेते कुंडलीक मेमाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कठोर परिश्रम, शिस्त आणि सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. आचार्य अत्रे प्रतिष्ठानच्या गुऱ्होळी व अष्टापूर येथील शाळांनी सलग शंभर टक्के निकालाची गौरवास्पद परंपरा यंदाही कायम राखल्याबद्दल त्यांचे विजयराव कोलते यांनी विशेष अभिनंदन केले . ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देत या शाळांनी उंचावलेला शैक्षणिक दर्जा उल्लेखनीय असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार दत्तानाना भोंगळे यांना धाराशिव येथे प्राप्त झालेल्या साहित्यिक विशेष पुरस्काराबद्दल तसेच पत्रकार सुनिल लोणकर यांना नुकत्याच सासवड येथे प्राप्त झालेल्या काकासाहेब पुरंदरे पुरस्काराबद्दल विजयराव कोलते यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी प्रतिष्ठानचे सचिव शांतारामबापू पोमण, ज्येष्ठ विधिज्ञ अण्णासाहेब खाडे, प्रा . डॉ .संदीप टिळेकर, ॲड. अश्पाक बागवान, बबनराव तावरे,संजय राऊत , डॉ . राजेश दळवी , दुर्गाडे सर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन धववट यांनी तर आभार बाळासाहेब खोमणे यांनी मानले . विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव, शिक्षकांचा सन्मान आणि पालकांच्या योगदानाची दखल घेणारा हा प्रेरणादायी सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## सुपा पोलिसांची तत्पर कारवाई अपहरण झालेल्या युवकाची सुखरूप सुटका, दोन आरोपी अटकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील सुपा पोलीस स्टेशन हद्दीतून रविवार दि ७ रोजी ऋषिकेश विजय चांदगुडे (रा. दंडवाडी, ता. बारामती, जि. पुणे) याचे अपहरण झाल्याची माहिती प्राप्त झाली. सदर घटनेत लाल रंगाची स्विफ्ट कार क्र. चक-४२-इग-४४४५ मधून ओंकार प्रकाश भोसले व तन्मय सुधीर साळुंखे यांनी ऋषिकेश चांदगुडे यास जबरदस्तीने घेऊन सासवडच्या दिशेने नेल्याची माहिती मिळाली.

सदर माहिती प्राप्त होताच सहाय्यक पोलीस निरीक्षक नवसरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवालदार विशाल गजरे, पोलीस हवालदार रुपेश साळुंखे, पोलीस हवालदार संदीप लोंढे, चालक पोलीस शिपाई सोमनाथ होले, पोलीस शिपाई सागर वाघमोडे, पोलीस शिपाई संतोष जावीर, पोलीस शिपाई भाऊसाहेब चौधरी, महिला पोलीस हवालदार दिपाली मोहिते, पोलीस शिपाई सचिन दरेकर व पोलीस शिपाई विलास वाघमारे यांचे विशेष पथक



तात्काळ रवाना करण्यात आले. तसेच जेजुरी, सासवड, उरुळीकांचन व यवत पोलीस स्टेशन यांना नाकाबंदीबाबत सूचना देण्यात आल्या.तपासादरम्यान कुलदीप चांदगुडे यांना प्राप्त झालेल्या मोबाईल कॉलची माहिती मिळाल्यानंतर संबंधित मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्यामध्ये लोकेशन दिवेघाट परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवालदार रुपेश साळुंखे, पोलीस हवालदार विशाल गजरे, चालक पोलीस शिपाई सोमनाथ होले, पोलीस शिपाई विलास वाघमारे व पोलीस शिपाई भाऊसाहेब चौधरी यांनी तात्काळ दिवेघाट परिसरात जाऊन संशयित वाहनाचा पाठलाग सुरू केला.

दरम्यान सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कदम यांच्याशी संपर्क साधून मदत मागविण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक जाधव व त्यांचे पथक मदतीस दाखल झाले. संयुक्त कारवाईदरम्यान झेंडेवाडी, ता. पुरंदर येथे संशयित स्विफ्ट वाहन अडविण्यात आले. वाहनामध्ये ओंकार प्रकाश भोसले (वय २७ वर्ष), तन्मय सुधीर साळुंखे (वय २० वर्ष) व दिव्या ओंकार भोसले (वय २२ वर्ष), सर्व रा. सातव चौक, बारामती आढळून आले. त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तांत्रिक माहितीच्या आधारे अपहरण झालेला ऋषिकेश विजय चांदगुडे यास सुरक्षितरित्या शोधून काढण्यात आले.

याप्रकरणी फिर्यादी ऋषिकेश विजय चांदगुडे यांच्या फिर्यादीवरून सुपा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ११९/२०२६ अन्वये बीएनएस कलम १४०(१), ११८(१), ११५, ३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी ओंकार प्रकाश भोसले व तन्मय सुधीर साळुंखे यांना अटक करण्यात आली असून त्यांना माननीय न्यायालयासमोर हजर केले असता ०४ दिवसांची पोलीस कोठडी रिमांड प्राप्त झाली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिनेश कोळी हे करीत आहेत.

सदर कारवाई माननीय पोलीस अधीक्षक सो संदीप सिंह गिल्ल , अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार , उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांचे मार्गदर्शनाखाली ,सहाय्यक पोलीस निरीक्षक नवसरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक जिनेश कोळी, पोलीस हवालदार विशाल गजरे, पोलीस हवालदार रुपेश साळुंखे, पोलीस हवालदार संदीप लोंढे, चालक पोलीस शिपाई सोमनाथ होले, पोलीस शिपाई सागर वाघमोडे, पोलीस शिपाई संतोष जावीर, पोलीस शिपाई भाऊसाहेब चौधरी, महिला पोलीस हवालदार दिपाली मोहिते, पोलीस शिपाई सचिन दरेकर व पोलीस शिपाई विलास वाघमारे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

# जिद्द, मेहनत आणि चिकाटीचा विजय

### आंबेगावच्या चार शेतकरी कुटुंबातील युवक-युवती बनले पोलीस उपनिरीक्षक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील कष्टकरी शेतकरी कुटुंबातील चार होतकरू युवक-युवतींनी कठोर परिश्रम आणि अविरत जिद्दीच्या जोरावर पोलीस उपनिरीक्षक (पीएसआय) पदाचे वर्षभराचे खडतर प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करत महाराष्ट्र पोलीस दलात अधिकृत प्रवेश केला आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जाधववाडी येथील भाग्यश्री जगन्नाथ जाधव, निरगुडसर येथील प्रशांत बबन दांगट, काठापूर येथील श्वेता सुखदेव करंडे आणि अवसरी बुद्रुक येथील स्वप्निल मच्छिंद्र हिंगे यांनी नाशिक येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रातील वर्षभराचे कठोर प्रशिक्षण पूर्ण केले. मंगळवार (९ जून) पासून



त्यांनी पोलीस उपनिरीक्षक म्हणून आपल्या सेवेला अधिकृत सुरुवात केली. मर्यादित साधनसामग्री, ग्रामीण परिस्थिती आणि शेतातील कष्ट यांवर मात करत या चारही जणांनी स्पर्धा परीक्षेच्या प्रवासात यश मिळवले. त्यांच्या यशामागे आई-वडिलांचे अथक परिश्रम, कुटुंबीयांचा त्याग आणि स्वतःची सातत्यपूर्ण मेहनत हेच खरे बळ ठरले. प्रशिक्षणादरम्यान त्यांना शारीरिक क्षमता विकास, पोलीस ठाण्यातील कामकाज, गुन्हे तपास, कायद्याची अंमलबजावणी, गोपनीयता, शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या पद्धती, नागरिकांशी संवाद, नेतृत्वगुण, वक्तृत्व आणि समयसूचकता यांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

नाशिक येथे पार पडलेल्या भव्य दीक्षांत समारंभात राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते एकूण ५८३ प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षकांना पदवी प्रदान करण्यात आली. आपल्या मुलांना खाकी वर्दीत पाहताना अनेक पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. ग्रामीण मातीतून मोठी स्वप्ने पाहून ती प्रत्यक्षात साकार करणाऱ्या या चार युवक-युवतींनी आंबेगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून, स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणादायी आदर्श ठरले आहेत.

यावेळी ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, ''आंबेगाव तालुक्यातील कष्टकरी शेतकरी कुटुंबांतील चार युवक-युवतींनी पोलीस उपनिरीक्षक पदाचे प्रशिक्षण पूर्ण करून पोलीस दलात प्रवेश केल्याचा मला विशेष अभिमान वाटतो. जिद्द, परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे. खाकी वर्दी ही केवळ नोकरी नसून समाजसेवेची मोठी जबाबदारी आहे. त्यांनी प्रामाणिकपणे आणि कर्तव्यनिष्ठेने जनतेची सेवा करावी, अशी अपेक्षा आहे.''

## शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकपदी चंद्रशेखर यादव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** पुणे ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या झाल्यानंतर शिक्रापूर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांची जिल्हा विशेष शाखेत बदली करण्यात आली असून शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकपदी बारामती ग्रामीणचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चंद्रशेखर यादव यांनी नुकताच दिपरतन गायकवाड यांच्याकडून शिक्रापूर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) पोलीस स्टेशन हद्दीमध्ये प्रत्येक वर्षी विजयस्तंभ अभिवादन सोहळा, छत्रपती श्री संभाजी महाराज पुण्यतिथी कार्यक्रम, औद्योगिक क्षेत्रातील समस्या तसेच अनेक कार्यक्रमांमुळे पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांवर महत्वाची जबाबदारी असताना पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांनी दोन वर्षामध्ये त्यांच्या कार्याचा ठसा उमटवत अनेक गुन्हेगारांवर कठोर कारवाया केल्या तर काही सराईतांची थेट धिंड करून गुन्हेगारी मोडून काढली असताना नुकतीच त्यांची बदली जिल्हा विशेष शाखेत होऊन चंद्रशेखर यादव यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशनची सूत्रे हाती घेतली आहे. चंद्रशेखर यादव हे यापूर्वी बारामती तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असताना त्यांनी अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच प्रशासकीय कामकाजातील अनुभवाच्या बळावर कामगिरी बजावली असून त्यांच्या नियुक्तीमुळे शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तर चंद्रशेखर यादव हे अनुभवी अधिकारी असल्याने त्यांच्यासमोर गुन्हेगारीवर नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, अवैध धंद्यांवर कारवाई यांसह आदी जबाबदारी राहणार असताना शिक्रापूर पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांची नव्या पोलीस निरीक्षकांच्या कार्यशैलीकडे लक्ष लागले आहे.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत विद्यमान मालक श्री. गौरीशंकर सोमनाथ कोरपे, रा. बोराटे वस्ती शिवशंकर सोसायटी, खराडी पुणे यांची वडीलार्जीत मालकी व कब्जे वहिवाटीची असुन, त्यांनी ती निर्वेध, निजोखमी व बोजा रहित असल्याचा भरोसा देऊन ती आमचे अशिलांबरोबर विक्री संबंधी बोलणी चालु असून त्याप्रमाणे आमचे अशिलांना विक्री करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, बोजारहीत असल्याचा भरवसा व खात्री दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासुन सात दिवसाचे आत पुराव्याचे कागदपत्रासह आमची खात्री पटवुन दयावी, सदर मुदतीत तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजुन ज्या कोणाचा हक्क, हितसंबध असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिलेली आहे असे समजुन आमचे अशिल ठरलेला व्यवहार पुर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

परीशिष्ट

गाव मौजे वाफगाव ता. खेड जि. पुणे येथिल गट नंबर १७०२ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ०३ हे ३० आर पोख ० हे ०१.५० आर एकुण क्षेत्र ०३ हे ३१.५० आर पैकी संपुर्ण हिस्सीचे क्षेत्र ०१ हे १०.५ आर पोखसह २. गट नंबर १६९९ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ० हे ३१.५० आर पोख ० हे ००.७५ आर एकुण क्षेत्र ० हे ३२.२५ आर पैकी संपुर्ण हिस्सीचे क्षेत्र ० हे १०.७५ आर पोखसह क्षेत्र, ३. गट नंबर १६९४ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ० हे १२ आर पैकी संपुर्ण हिस्सीचे क्षेत्र ० हे ००.५० आर, ४. गट नंबर १६९८ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ० हे ०४ आर पैकी १/३ हिस्सीचे क्षेत्र ० हे ०१.३३ आर. ५. गट नंबर १७०१ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ० हे ०७ आर (पोखसह) पैकी संपुर्ण हिस्सीचे क्षेत्र ० हे ००.६१ आर. ६. गट नंबर १७०३ यापैकी लिहून देणार यांची समाईकातील क्षेत्र ० हे ०६ आर पैकी संपुर्ण हिस्सीचे क्षेत्र ० हे ००.३१ आर, येणेप्रमाणे संपुर्ण हिश्याचे क्षेत्राची जमिनी मिळकती चर्तु: सिमा पुर्वक मिळकती.

राजगुरुनगर
दिनांक :- ०३/०६/२०२६

**खरेदी घेणारातर्फे ॲडव्होकेट**
**श्री. श्रीप्रसाद सेनापती टाकळकर**
**सिताराम अर्पाटमेंट, वाडा रोड, कोर्टाचे पाठीमागे, राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.**
**मो. नं. ७७५७८०८७७७**

द•ख•ल

## ढोरजळगाव ग्रामपंचायत निवडणूक आरक्षण सोडत संपन्न

**ढोरजळगाव :** शेवगाव तालुक्यातील मुदत संपलेल्या ढोरजळगाव शे व ढोरजळगाव ने ग्रामपंचायतची प्रभाग निहाय आरक्षण सोडत तहसीलदार शेवगाव यांच्या आदेशानुसार मंगळवार दि.९ रोजी पार पडली. राज्यातील सन २०२४-२५ मध्ये मुदत संपलेल्या व २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या प्रभाग आरक्षण सोडतीचा कार्यक्रम ग्रामपंचायत ढोरजळगाव येथे तहसीलदार आकाश दहाडदे यांच्या आदेशाने विशेष ग्रामसभेचे सकाळी १० वाजता आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडलाधिकारी भाऊसाहेब मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षण सोडत संपन्न झाली. यावेळी ढोरजळगाव शे ग्रामपंचायत येथे रोटेशन पद्धतीने आरक्षण काढण्यात आले. सर्व प्रभागातील स्त्री राखीव जागा प्रभागनिहाय ठरविण्यात आल्या. व प्राधान्यक्रम विचारात घेऊन आरक्षित प्रभाग निश्चित करण्यात आले. यामध्ये ग्रामपंचायत उपलब्ध जनगणनेच्या लोकसंख्येनुसार एकूण चार प्रभागांपैकी ११ जागांसाठी प्रभाग एक मध्ये अ.जा.स्त्री, ना. मा. प्र.स्त्री, सर्वसाधारण, प्रभात क्रमांक दोन मध्ये अ.जा., ना.मा.प्र, सर्वसाधारण स्त्री तसेच प्रभाग क्रमांक तीन मध्ये सर्वसाधारण स्त्री,सर्वसाधारण स्त्री,व सर्वसाधारण या प्रमाणे तसेच प्रभाग क्रमांक चार मध्ये ना. मा. प्र.स्त्री व सर्वसाधारण याप्रमाणे आरक्षण निघाले. यावेळी ग्रामविकास अधिकारी रवींद्र शेलार, तलाठी दगडे, यांनी सहकार्य केले. तसेच ग्रामपंचायत ढोरजळगाव ने येथे मंडलाधिकारी भाऊसाहेब मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी २ वाजता लहान मुलांच्या हस्ते चिठ्ठी काढून आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानुसार एकूण ९ जागांसाठी काढण्यात आलेल्या प्रभाग निहाय आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती राखीव जागा, अनुसूचित जमाती स्त्री राखीव जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या जागा, नागरिकांच्या मागास प्रवर्ग स्त्री राखीव जागा, सर्वसाधारण स्त्री राखीव जागा व सर्वसाधारण जागा याप्रमाणे आरक्षण काढण्यात आले. यावेळी ग्रामविकास अधिकारी डोंगरे भाऊसाहेब व सर्वपक्षीय कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरज बेळगे यांची आरोग्य सेवा लिपीकपदी निवड

**ढोरजळगाव :** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांव येथील सुरज भरत बेळगे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथे लिपीक पदी निवड झाली आहे.सुरज बेळगे



यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हे यश मिळवले असुन आई वडीलांचे छत्र हरपल्यानंतर न डगमगता त्यांनी अभ्यासामध्ये सातत्य ठेऊन व भाऊ शरद व मित्रांच्या वेळोवेळी मदत व मार्गदर्शनाच्या जोरावर हे यश मिळविले असुन त्यांचे प्राथमिक शिक्षण ढोरजळगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे तर माध्यमिक शिक्षण श्रीराम विद्यालय ढोरजळगाव उच्च माध्यमिक शिक्षण आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहिल्यानगर येथे तर अभियंता पदवी व एमबीए चे शिक्षण पुणे येथे पुर्ण केले असून सुरज यांनी अभ्यासामध्ये सातत्य ठेवत हे यश संपादन केले आहे.त्यांच्या या यशाबद्दल ढोरजळगावशे गरडवाडी, आपेगाव, मलकापूर परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे अभिनंदन होत आहे.

## मृत्युस कारणीभूत : आरोपी निर्दोष

**नगर :** दि. ०१/०१/२०१९ रोजी सकाळी ८.०० वा. चे सुमारास चंदनापुरी शिवारात जावळे वस्ती समोर संगमनेर- पुणे जाणारे रोडवर आपले ताब्यातील टेम्पो क्र. एम.एच. ११-बीएल-७१६० हा संगमनेरकडून ते पुणे रोडने भरधाव वेगात, निष्काळजीपणे चालवून पुढील वाहनास पाठीमागून क्लिनर साईडने जोराची ठोस दिल्याने चालका शेजारील सीटवर बसलेले मंगेश बाळासाहेब रसाळ, रा. सातारा यांच्या डोक्यास व हाता पायास जबर दुखापत होऊन त्यांचे मृत्युस जबाबदार झाले. तसेच स्वतःचे दुखापतीस कारणीभूत झाले म्हणून संगमनेर पोलिसांनी आरोपी रामचंद्र जनार्धन ढेबे, रा. महड, जि. रायगड यांचे विरुध्द भा.दं. वि. कलम ३०४अ, २७९, ३३७,३३८, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४, १३७अ, ब, १३५ अन्वये गुन्हा दाखल केला असता, त्याची चौकशी संगमनेर न्यायालयात होऊन त्यात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. आरोपीतर्फे बचाव घेण्यात आला की, आरोपी हा वाहतुकीचे सर्व नियमांचे पालन करुन वाहन चालवत होता. फोर लेनमध्ये विरुध्द बाजुने राँग साईडने डंपर येऊन त्याने धडक मारुन निघून गेला असा बचाव होता. आरोपीतर्फे अ‍ॅड. सतिशचंद्र वि. सुद्रीक यांनी काम पाहिले.

## पंचायत समितीने दलित वस्तीची व्याख्या बदलली आहे का ?

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पंचायत समितीच्या कारभारावर सध्या अनेक स्तरातून प्रश्न उपस्थित केले जात आहे. दलित वस्ती नसलेल्या भागाला दलित वस्ती म्हणून घोषित करण्यात आल्याची चर्चा तालुक्यात जोर धरीत आहे. यामुळे अनुसूचित जातींसाठी राखीव निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप होत असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक ठिकाणी बोगस दलित वस्ती घोषित करून लाखो रुपयांच्या निधीचा गैरवापर झाल्याची जोरदार चर्चा आहे. याबाबत अनेकदा तक्रारी उद्धवल्या जात आहेत मात्र याकडे कानाडोळा केला जातो. विशेष म्हणजे ज्या ठिकाणी प्रत्यक्षात दलित समाजाची वस्ती अल्प किंवा अस्तित्वातच नसल्याचे सांगितले जाते. त्या भागात दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत कामे मंजूर झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पंचायत समितीच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त होत आहे. आता दलित वस्ती ठरवण्याचे निकष बदलले का? असा सवाल सामाजिक कार्यकर्त्यांकडून उपस्थित केला जातो. काही ठिकाणी तर नकाशावर दलित वस्ती, पण वास्तवात वेगळीच बस्ती अशी उपरोधिक चर्चा आहे. दलित समाजाच्या मूलभूत सुविधा, रस्ते, गटारी, पाणीपुरवठा आणि सामाजिक विकासासाठी शासनाकडून विशेष निधी दिला जातो. मात्र तो निधी नियमबाह्य पद्धतीने इतरत्र वळवला गेला असेल, तर हा गंभीर प्रकार आहे. दरम्यान, संबंधित कामांच्या मंजुरी प्रक्रिया, लोकसंख्या नोंदी, ग्रामपंचायत ठराव आणि प्रत्यक्ष पाहणी यांची चौकशी करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

## आबासाहेब काकडे विद्यालयाच्या कु. आदिती विघ्नेला सुवर्णपदक

**शेवगाव :** श्रीरामपुर येथे नुकत्याच दि. ०७ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय असोसिएशन पिच्याक सिलाट स्पर्धेमध्ये हसनापूर येथील व कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचच्या आबासाहेब काकडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी आदिती विघ्ने हिने या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच कु. आदिती हिला कराटे प्रशिक्षक शशिकांत नवगिरे सर व सुंदर नवगिरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कु.आदिती हिच्या यशस्वीतेसाठी आई व वडील अजिनाथ विघ्ने, सहशिक्षक शहरटाकळी हायस्कूल यांचे मोठे योगदान लाभले. आदिती हिने तिच्या शाळेचे नाव आणि तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर गाजवले. त्याबद्दल आदिती हिचे कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष डॉ. विद्याधर काकडे, जि.प.सदस्या हर्षदा काकडे, युवा नेते पृथ्वी काकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी व प्राचार्य डॉ.लक्ष्मण बिटाळ, सहप्रमुख अशोक आहेर, वंदना पुजारी यांनी तिच्या यशाबद्दल हार्दिक अभिनंदन केले.

### पावसाळ्याच्या उंबरठ्यावरही तहानलेला तालुका

# पंधरा गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर तालुक्यात जून महिना सुरू झाला असला तरी पावसाच्या प्रतीक्षेत असलेला ग्रामीण भाग आजही पाण्याच्या टंचाईने होरपळत आहे. एका बाजूला खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी मशागतीची कामे पूर्ण करून पेरणीची तयारी केली आहे. तर दुसऱ्या बाजूला पिण्याच्या पाण्यासाठी अनेक गावांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. तालुक्यातील १५ गावांमध्ये तहान भागविण्यासाठी टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. जेऊर व बाबुर्डी गावचे टँकर साठी प्रस्ताव प्रशासनाकडे दाखल झाले आहेत.

### जेऊर, बाबुर्डी गावचे प्रस्ताव दाखल ; बळीराजांच्या स्वप्नांच्या पेरणीवर चिंतेचे ढग

पावसाळ्याच्या उंबरठ्यावर तब्बल १५ गावांमध्ये सध्या टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून जेऊर आणि बाबुर्डी या गावांकडूनही टँकर सुरू करण्यासाठी प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आले असल्याने तालुक्यात विदारक परिस्थितीचे चित्र दिसून येत आहे. वाढते तापमान, घटलेली भूजल पातळी आणि रिकामे पडलेले विहिरी-बोअरवेल यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची चिंता वाढली आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू झाले असले तरी अद्याप समाधानकारक




**टँकरने पाणीपुरवठा सुरू असलेली गावे !**
इमामपूर, बहिरवाडी, ससेवाडी, मदडगाव,रांजणी, अकोळनेर, खांडके, भोयरेपठार, बाळेवाडी, भोयरे खुर्द, उक्कडगाव, कोल्हेवाडी, सांडवे, भातोडी, पारगाव.

पाऊस न झाल्याने पाण्याचा प्रश्न कायम आहे. शेतकरी वर्गाने खरीप हंगामाच्या पेरणीसाठी शेत शिवार तयार करून ठेवले आहेत. नांगरणी, कुळवणी,

### मान्सूनबाबत तर्क वितर्क ; मशागत झाली वरुणराजाची प्रतीक्षा ; आकाशाकडे नजरा

वखरणी यांसह मशागतीची बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. बियाणे, खते आणि इतर साहित्याची जमवाजमवही करण्यात आली आहे. मात्र पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा अद्याप कायम असल्याने बळीराजाच्या नजरा आकाशाकडे खिळून आहेत. काळे ढग दिसले की आशा पल्लवित होते. मात्र काही वेळातच ढग विरून जात असल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरत आहे. खरीप हंगामातील पेरणीवर चिंतेचे ढग दिसून येत आहेत. मागील वर्षी याच काळात मान्सूनपूर्व

जेऊर गावातील वाड्या वस्त्यांवर पाणी टंचाई जाणवत आहे. टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रशासनाकडे प्रस्ताव दाखल करण्यात आलेला आहे. पाऊस लांबल्यास पाणीटंचाईच्या झळा तीव्र होणार आहेत.
**ज्योती तोडमल (सरपंच, जेऊर)**

पावसाने जोरदार हजेरी लावून पूर परिस्थितीने धुमाकूळ घातला होता. शिवार हिरवेगार होण्यास सुरुवात झाली होती. यंदा मात्र परिस्थिती उलट आहे. गावोगावी पाण्याची चिंता वाढत असताना शेतकरी पावसाच्या आगमनाची वाट पाहत आहे. ग्रामीण भागात पाणी आणि पाऊस हेच सध्या चर्चेचे प्रमुख विषय बनले आहेत.

## बालविवाह, अवैध गर्भपात व औषध विक्री चिंताजनक

**दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यात बालविवाह, अल्पवयीन गर्भधारणा, अवैध गर्भपात आणि गर्भनिरोधक गोळ्यांच्या सर्रास विक्रीबाबत गंभीर चर्चा सुरू असून बाहेरच्आया पथकाने श्रीगोंद्यात कारवाई केल्यामुळे श्रीगोंदा तालुक्यातील आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

भारतात 'बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६'लागू आहे. या कायद्यानुसार, मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी आणि मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असताना होणारा विवाह 'बालविवाह' मानला जातो. असा विवाह करणे कायदेशीर गुन्हा आहे.तरीही श्रीगोंद्यात अनेक बालविवाह जोमात होताना दिसत आहेत त्यांतर अल्पवयीन गर्भधारणा म्हणजे १९ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयाच्या मुलींमध्ये राहणारी गर्भधारणा आहे ही एक अत्यंत संवेदनशील आणि गंभीर वैद्यकीय व सामाजिक समस्या आहे यात आई आणि बाळ दोघांच्याही आरोग्याला गंभीर धोका असतो त्यानंतर बेकायदेशीर गर्भपात म्हणजे वैद्यकीय कायद्यांचे उल्लंघन करून, अनधिकृत व्यक्तीकडून किंवा सरकारने मान्यता न दिलेल्या ठिकाणी केलेली गर्भधारणा संपुष्टात आणण्याची प्रक्रिया होय. भारतात वैद्यकीय गर्भधारणा समाप्ती कायदा अंतर्गत काही विशिष्ट अटींनुसार गर्भपात कायदेशीर आहे. या कायद्याच्या चौकटीबाहेर केलेला कोणताही गर्भपात हा कायद्याने गंभीर आणि दंडनीय गुन्हा मानला जातो.भारतात वैद्यकीय सल्ल्याशिवाय किंवा नोंदणीकृत डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय गर्भपाताच्या गोळ्या खरेदी करणे आणि स्वतःहून वापरणे हा पूर्णपणे बेकायदेशीर आणि अत्यंत धोकादायक प्रकार असताना श्रीगोंद्यात सगळे काही आलबेल सुरु आहे मागील गेल्या काही दिवसांत बाहेरून आलेल्या पथकांकडून विविध ठिकाणी कारवाया आणि तपासण्या करण्यात आल्याने अनेक धक्कादायक बाबी समोर येत असल्याची चर्चा आहे.

त्यामुळे स्थानिक स्तरावर नियमित तपासणी आणि देखरेख होत आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. तालुक्यात अवैध गर्भपाताचे प्रकार नेमके कुठे आणि कशा पद्धतीने सुरू आहेत, याचीही सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.दरम्यान, तालुक्यात बालविवाहाचे प्रमाण वाढत असल्याचीही चर्चा असून अल्पवयीन मुली गर्भधारणेनंतर उपचारासाठी शासकीय किंवा खाजगी रुग्णालयात दाखल झाल्यावर अनेकदा संबंधित डॉक्टरांच्या निदर्शनास वयाची बाब येत असल्याचे सांगितले जाते.

अशा प्रकरणांमध्ये पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण वाढत असल्याचेही समोर येत आहे.यासोबतच गर्भनिरोधक गोळ्यांची कोणत्याही वैद्यकीय सल्ल्याविना होत असलेली विक्री हा देखील चिंतेचा विषय बनला आहे. औषध प्रशासन आणि आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.समाजातील वाढती जागरूकता, शाळा व महाविद्यालय स्तरावरील समुपदेशन, बालविवाह प्रतिबंध मोहिमा आणि आरोग्य विभागाची प्रभावी देखरेख यांची आता अधिक गरज असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त केले जात आहे.

## वादळी वाऱ्याचा वांगदरी परिसरातील शेतकऱ्यांना अस्मानी फटका

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** दोन दिवसापूर्वी परिसरात तुफान वादळी वाऱ्यासह पावसाचे आगमन झाले आणि पहिल्याच पावसात वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणात विद्युतचे पोल,झाडे उखडून पडली. लिंबूनी डाळिंब याचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. ऊसाचे क्षेत्र अक्षरशः यात झोपले आहे. घराच्या छतावरील पत्रे उडाले सोलरचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. परिसरातील शेतकऱ्यांनी सरकारी पंचनाम्याची मागणी केली आहे व तात्काळ नुकसान भरपाईची मागणी केली आहे. गावच्या सरपंच सौ.सुजाता तुषार नागवडे यांनी कामगार तलाठी यांच्याशी संपर्क करून पंचनाम्या बाबत सूचना केली आहे. लोकप्रतिनिधी यांनी देखील तालुक्यात तात्काळ दौरा करून शेतीच्या नुकसानीची पाहणी सुरु केली आहे. व नुकसानीचे पंचनामे करण्याचे तहसीलदार यांना आदेश केले आहेत. शेतकऱ्यांच्या



बाबतीत बाजार भावाचे संकट असताना कर्जमाफी बाबत संभ्रम अवस्था असताना आता हे पहिल्या पावसात असमानी संकट शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे शेती व शेतकरी पुरता कोलमडून पडला आहे. आता सरकारने या आसमानी संकटात शेतकऱ्यांना मदतीचा आधार देण्याची गरज असल्याचे मत वांगदरी सोसायटी चे चेअरमन राजेंद्र निळकंठ नागवडे यांनी परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने केली आहे.

## अधिक मासातील कालाष्टमी व नवमी निमित्त श्री क्षेत्र मोहटादेवी गडावर भाविकांची गर्दी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** उन्हाळी सुट्ट्या, अधिकमास या महिन्यातील मंगळवारी आलेल्या कालाष्टमी व नवमीच्या विशेष पर्वणी साधत भाविक भक्तांनी हजारोंच्या संख्येने श्री मोहटादेवी गडावर दर्शनासाठी प्रचंड गर्दी केली. दर्शनासाठी आलेल्या प्रत्येक भाविकांचे दर्शन सुलभ पद्धतीने होईल असे नियोजन देवस्थानकडुन करण्यात आलेले होते. पार्किंग व्यवस्था, दर्शन रांग, जागोजागी पिण्याचे पाणी व्यवस्था, दर्शन रांगेमध्ये जागोजागी सर्क्युलेटिंग फॅन इ. उत्कृष्ट नियोजन करण्यात आलेले होते. देवीच्या दर्शनासाठी गडावर पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. आई राजा उदो उदो च्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला होता. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून पिण्याच्या पाण्याची आणि सावलीची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविक भक्तांसाठी देवस्थानच्या वतीने महाप्रसादाचे नियोजन करण्यात आलेले होते. देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उपआयुक्त नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली भाविकांची गर्दी लक्षात घेऊन विशेष सुविधांचे देण्यासाठी विशेष नियोजन केले होते. देवस्थान मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे व जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे यांनी देवस्थानच्या वतीने आलेल्या भाविकांचे स्वागत केले व सर्व व्यवस्था नियोजन यावर बारकाईने लक्ष ठेवून होते.

## श्रीगोंदा तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाला प्रारंभ

### ९ जून दरम्यान आढळगाव मंडळमध्ये सर्वाधिक पावसाची नोंद!

**नंदकुमार कुरुमकर। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात मान्सून पूर्व पावसास गेल्या दोन दिवसापासून प्रारंभ होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या खरीप हंगामा विषयी अपेक्षा वाढताना दिसत आहे. सायंकाळी पाच वाजता वातावरणात अचानक बदल होऊन वादळी वाऱ्यासह विजेचा कडकडाट होऊन वेगवान पाऊस सुरू होत आहे. दरम्यान या दोन दिवसाच्या पावसामुळे वातावरणात मोठा गारवा जाणवत असून, शेतकरी आता खरीप हंगामाच्या पेरणीस या पावसाच्या धरतीवर प्रारंभ करू शकतात. चालू वर्षी उन्हाची तीव्रता अत्यंत गंभीर बनली गेली. अतिउष्णतेमुळे



आहे, त्या पाण्याचे देखील मोठ्या प्रमाणात बासपीभवन होऊन होऊन गेले. सर्वत्र पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा देखील प्रश्न गंभीर बनला गेला होता. अशा परिस्थितीत उन्हाळी हंगामातील पिके पाण्याविना करपून गेली. फळबागा देखील अंतिम घटका मोजत होत्या. शेतकऱ्यानी मात्र विकत पाणी घेऊन कशाबशा फळबागात जगवल्या. याचा परिणाम कुकडी लाभ क्षेत्रात मोठ्या प्रमाणात जाणवला. उन्हाळी हंगामासाठी कुकडीचे दुसरे आवर्तन मिळेल, परंतु शेतकऱ्यांना कुकडीचे हक्काचे पाणी काही मिळाले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये कुकडीच्या अधिकाऱ्यांबाबत संताप व्यक्त केला जात आहे. अखेर मेघराजा शेतकऱ्यांसाठी धावून आला. त्यामध्ये कुकडीचे पाणी आणि पाऊस यांचा संगम गेल्या दोन दिवसापासून दिसत आहे. पाऊस झाल्यानंतर संबंधित कुकडीचे अधिकारी शेतकऱ्यांना पाणी घेता का? अशी विनवणी आता करू लागले आहेत. ज्यावेळेस शेतकऱ्याला पाण्याची गरज होती. त्यावेळेस मात्र कुकडीचे अधिकारी आवर्तनाबाबत निशब्द झाले होते. अशी परिस्थिती या कुकडी लाभ क्षेत्रात शेतकऱ्यांना चालू वर्षी पहावयास मिळाली. त्यामुळे कुकडीच्या आवर्तनाबाबत शेतकऱ्यांच्या मनामध्ये आजही संताप व्यक्त होताना दिसत आहे लोकप्रतिनिधी व पालकमंत्र्यांनी या प्रश्नात लक्ष घालायला हवे होते परंतु दुर्दैवाने शेतकऱ्यांच्या भावना त्यांच्याकडून समजून घेतल्या गेल्या नाहीत ही दुर्दैवी बाब आहे.

## विकासकामे केवळ निधीची नव्हे, समृद्धीची गुंतवणूक : आ. दाते

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील बाभुळवाडा परिसरातील पायाभूत सुविधा आणि जलसंधारणाला बळ देणाऱ्या विकासकामांचा शुभारंभ पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आ. काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यामध्ये बाभुळवाडा ते दरोडी रस्ता मुरुमीकरण काम तसेच जि.प.लघु पाटबंधारे विभागामार्फत मंजूर करण्यात आलेल्या को.प. बंधारा कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करायचा असेल तर रस्ते आणि पाणी या मूलभूत गरजांवर भर देणे आवश्यक आहे. मतदारसंघातील प्रत्येक



बाभुळवाडा परिसरातील रस्ता व बंधाऱ्याची कामे गावाच्या विकासासाठी महत्त्वाची आहेत. जनतेच्या अपेक्षा लक्षात घेऊन विकासाचा निधी गावागावांत पोहोचविण्याचे काम आ. दाते करत आहेत. या कामांमुळे बाभुळवाडा परिसराच्या प्रगतीला निश्चितच नवी दिशा मिळेल.
**वसंतराव चेडे**

गावाला चांगले रस्ते, पाणी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. विकासकामे ही केवळ निधीची नव्हे तर जनतेच्या विश्वासाची आणि भविष्यातील समृद्धीची गुंतवणूक असते. यावेळी विश्वनाथ कोरडे, वसंतराव चेडे, प्रशांत जगदाळे, देवेंद्र जगदाळे, डॉ. सुरेश खणकर, विशाल खणकर, मनसुख कोरडे, दिगंबर जगदाळे, जयराम जगदाळे, प्रमोद खणकर, वसंत मातेरे, अच्युतराव जगदाळे, दत्तात्रय जगदाळे, भिवाजी जगदाळे, निशिगंधा बोरुडे, भाऊसाहेब जगदाळे, बबन शिर्के, महादू जगदाळे, संतोष बोरुडे, रेवणनाथ खणकर, शरद जगदाळे, अविनाश जगदाळे, दत्तात्रय क्षीरसागर, उत्तम जगदाळे, जय शिर्के, भाऊ खोडदे, भाऊ पटाडे उपस्थित होते.

## पहिल्याच पावसात श्रीगोंदा-मांडवगण रोडच्या कामाची पोलखोल; नागरिकांत संताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा-मांडवगण रोडचे रुंदीकरण व मजबुतीकरणाचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासनाकडून तब्बल २१५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामाची अंमलबजावणी कृष्णाई इन्फ्रा कंपनीकडून केली जात आहे. मात्र सोमवारी (दि. ८) सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास झालेल्या पहिल्याच पावसात या कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

परिसरातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यावर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचले असून मोठमोठे खड्डे पडले आहेत. परिणामी रस्त्यांवर पाण्याची तळी निर्माण झाली असून वाहनचालक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता दुरुस्तीचा केवळ देखावा करण्यात आला असून पहिल्याच पावसात कृष्णाई इन्फ्रा कंपनीचे पितळ उघडे पडले आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

विशेषतः शाळेकडे जाणाऱ्या रस्त्यांवर खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने



विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. चिखल, खड्डे आणि साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक कामे पूर्ण करण्यात आली नसल्यास संपूर्ण पावसाळाभर नागरिकांना याच समस्यांचा सामना करावा लागणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आमदार विक्रम पाचपुते यांनी या प्रश्नात तातडीने लक्ष घालून संबंधित यंत्रणेला योग्य सूचना द्याव्यात व कामाचा दर्जा तपासावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान, या संदर्भात संबंधित कामाच्या व्यवस्थापकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही. ही बातमी स्थानिक दैनिकाच्या शैलीत तयार करण्यात आली आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार दि.१० जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## रेल्वेच्या धडकेने एकाचा मुत्यू


प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील रेल्वे ओव्हरब्रिजजवळ एका अनोळखी इसमाचा रेल्वेच्या धडकेने मुत्यू झाला.याप्रकरणी रेल्वे पोलिसांनी अकस्मात मुत्यूची नोंद करण्यात आली.याबाबत हॉलीडे एक्सप्रेस च्या ट्रेन मॅनेजरने वॉकी टॉकीवरून रेल्वे पोलिसांना कळविले की, रेल्वे ओव्हर ब्रिजजवळ एक अनोळखी इसम गाडीने जखमी झाला आहे.त्यानंतर रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असता अंदाजे (वय ५० ते ५५ वर्ष ) वयाचा अनोळखी पुरुष आढळून आला.त्यास पुढील उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र डॉक्टरांनी इसमास तपासले असता, तो उपचारामधीच मयत झाला.याप्रकरणी,अकस्मात मुत्यूची नोंद करण्यात आली.

# आषाढी वारीतील वारकऱ्यांच्या सुविधांसाठी

## अहिल्यानगरला ३.८६ कोटींचा निधी मंजूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणाऱ्या वारकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजने'अंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्याला ३ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातून विश्वगुरू संत निवृत्ती महाराज, संत श्री एकनाथ महाराज, श्री संत निळोबाराय महाराज व श्री ज्ञानेश्वर आषाढी वारी पालखी (नेवासा) यांच्याबरोबरच अन्य पालख्याही पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी तात्पुरती शौचालये, स्वच्छतागृहे, स्नानगृहे बांधणे, पिण्याच्या पाण्याची सोय, वैद्यकीय सुविधा, औषधे पुरवणे तसेच जलरोधक मंडप उभारणीकरिता निधी उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. याबाबतचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शासनास सादरही करण्यात आला होता.

राज्यातील महायुती सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ३ कोटी ८६ लाख १० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असून, याला प्रशासकीय मान्यताही मिळाली आहे. या निधीतून वारकऱ्यांसाठी सर्व सोयीसुविधा उभारण्यात येणार आहेत. मागील दोन वर्षांपासून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील पालख्यांना आणि वारकऱ्यांना प्रशासनाच्या माध्यमातून चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

> आषाढी वारी हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. या सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या अहिल्यानगरच्या पालख्यांचा मान महत्त्वपूर्ण आहे. म्हणूनच या पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांकरिता चांगल्या सोयीसुविधा मिळाव्यात म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मान्य केल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी आभार मानले आहेत.

# रेल्वे पोलिसांची मोठी कारवाई

## ११.०८ लाखांची रेल्वे मालमत्ता जप्त | चार आरोपी अटकेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**राहुरी** : रेल्वेची मालमत्ता चोरी करणाऱ्या संघटित टोळीचा पर्दाफाश करत रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि रेल्वे पोलिसांनी सुमारे ११ लाख ८ हजार ९१२ रुपयांची रेल्वे सिग्नलिंग सामग्री जप्त केली. तर या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईमुळे भारतीय रेल्वेचे मोठे आर्थिक नुकसान टळले असून रेल्वे वाहतूक सुरक्षेलाही संभाव्य धोका टाळण्यात यश आल्याचे रेल्वे प्रशासनाने म्हटले आहे.

या संदर्भात मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरपीएफ अहिल्यानगरचे निरीक्षक बेनीप्रसाद मीणा यांच्या मार्गदर्शनाखाली आरपीएफ क्राईम ब्रांच सब युनिट, दौंडचे पीएसआय एकनाथ गडधे, मुख्य आरक्षक रामनाथ केकान, कॉन्स्टेबल धनंजय यादव तसेच आरक्षक दीपक कर्डीले, विशाल पायघन आणि गुलाब येवले यांच्या पथकाने दौंड हायवेवरील खडकी-चिखली गावांदरम्यान सापळा रचला. संशयित वाहनांची तपासणी केली असता रेल्वेच्या सिग्नल व दूरसंचार विभागातील महत्त्वाची सामग्री बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचे निदर्शनास आले.

या कारवाईत सागर अशोक नवसारे (रा. मुळानगर, ता. राहुरी), नितीन शंकर भालसिंग (रा. वाळकी, जि. अहिल्यानगर) आणि अमोल चंद्रभान पेरणे (रा. तांदुळवाडी, ता. राहुरी) यांना ताब्यात घेण्यात आले. जप्त साहित्यामध्ये सुमारे ३.५ किलोमीटर लांबीची १२ कोर सिग्नलिंग केबल, ६०० मीटर ६ कोर सिग्नलिंग केबल, सुमारे एक किलोमीटर मिश्रित १२ व ६ कोर केबल, ३९ मीटर जी.आय. पाइप, एक आर.एस. प्रकारची पॉइंट मशीन तसेच १५० किलो जी.एस. वायरचा समावेश आहे. या साहित्याची एकूण किंमत ११ लाख ८ हजार ९१२ रुपये इतकी असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले.

प्राथमिक चौकशीत संबंधित सामग्री हलविण्यासाठी रेल्वेच्या सिग्नल व दूरसंचार विभागाकडून कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर रेल्वे मालमत्ता चोरी झाल्याचा अधिकृत अहवाल सादर करण्यात आला. पुढील तपासात निरीक्षक बेनीप्रसाद मीणा आणि त्यांच्या पथकाने या प्रकरणातील चौथा आरोपी हरिराम चेतराम रायकवार (वायरमन तथा डेपो इंचार्ज, मूळ रा. हरदुवा मानगड, जि. दमोह, मध्य प्रदेश) याचा सहभाग उघडकीस आणला. त्याला विशापूर येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. या प्रकरणी दौंड रेल्वे पोलिस ठाण्यात रेल्वे मालमत्ता (अवैध ताबा) अधिनियम कलम ३(अ) तसेच रेल्वे अधिनियम कलम १४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ऑपरेशन रेल सुरक्षा अंतर्गत करण्यात आलेल्या या कारवाईत चोरीस गेलेली शंभर टक्के मालमत्ता हस्तगत करण्यात रेल्वे पोलिसांना यश आले असून या कारवाईचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# श्रीरामपुरात तरुणावर हल्ला, सहा जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरात गोंधवणी परिसरात राहणाऱ्या प्रशांत देविदास कहाणे (वय ३१ ) यांच्यावर काही तरुणांनी हल्ला केल्याची घटना सोमवारी रात्री घडली. याप्रकरणी ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

याबाबत प्रशांत कहाणे (रा. कुंभार गल्ली महादेव नगर गोंधवणी) याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपल्याकडे आपला मित्र अविनाश वारुणगसे (रा. सिन्नर ) यांची महेंद्र स्कॉरपिओ नं. एम.एच. १५ ईई ०७३८, ही वापरण्यासाठी आहेत. काल सोमवारी रात्री ९.३० वाजता सदर स्कॉरपिओ मधून बेलापूर-श्रीरामपूर रोडवरील दुकानातून छत्रपती शिवाजी महाराज चौकामार्गे गोंधवणी येथे घरी जात असताना एज्युकेशन शाळेजवळ त्रिमूर्ती ग्लास अँड अँल्युमिनियम वर्क दुकानासमोर ९.४५ च्या सुमारास रोडवर दोन मोटारसायकली आडव्या लावलेल्या होत्या. एका बाजूला सहा-सात इसम हातात ल

ाकडे दांडे, लोखंडी रॉड घेऊन उभे होते.तसेच एकाच्या हातात बंदुकीसारखे काहीतरी दिसले. आपण त्याकडे दुर्लक्ष करून गाडीतून पुढे जात असताना त्यांनी अचानक लाकडी दांडे गाडीवर मारले त्यामुळे आपल्याला मारणार या भितीने आपण तेथून जोरात गाडी काढली तेंव्हा काहींनी माझा पाठलाग सुरू केला. आपण गोंधवणी भैरवनाथनगर - फरगडे वस्ती सुतगिरणीमार्गे पोलीस स्टेशनला दाखल झालो होतो.

घडलेला प्रकाराबद्दल पोलिसांना सांगितले. सदर घटनेबाबत आपण माहिती काढली असता त्यामध्ये अर्जुन दाभाडे व त्याच्या टोळीचे लोक असल्याचे समजले.प्रशांत कहाणे याच्या फिर्यादीवरुन अर्जुन दाभाडे, किरण बोरकर, विकी ढमके, नमोद कांबळे, विवेक दाभाडे व इतर चार ते पाच जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## अवैध वाळू वाहतुकीच्या ढंपरसह एकाविरुध्द गुन्हा




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्या इसमांविरुध्द नेवासा पोलीस ठाण्याकडून कारवाई करण्यात आली असून अवैद्य वाळू वाहतूक करणाऱ्या गोविंद बबन मोरे वय ४० वर्ष, रा.हंडीनिमगाव ता.नेवासा यास पोलिसांनी ढंपरसह ताब्यात घेतले आहे. नेवासा पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक ९ जून २०२६ रोजी सकाळी ०६.३० वा.चे सुमारास नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांना गुप्त बातमीदारामार्फत ज्ञानेश्वर मंदिराच्या पाठिमागे अवैध्यरित्या वाळुची वाहतुक चालु असल्याची माहिती मिळाली.त्यानंतर पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी यांनी तपास पथकाला कारवाई करण्याबाबत आदेशित केले.

बातमीप्रमाणे नमुद स्टाफ यांनी जावुन खात्री केली असता ज्ञानेश्वर मंदिराचे पाठिमागे २,५०,००० रु. किंमतीचा टाटा कंपनीचा लाल पांढरे रंगाचा विना नंबरचा ढंपर व १०,००० रु.किं. ची दोन ब्रास वाळु सह इसम गोविंद बबन मोरे वय ४० वर्ष, रा. हंडीनिमगाव ता. नेवासा जिल्हा अहिल्यानगर हा वाळुसह वाहतुक करताना मिळुन आल्याने पोकॉ/२४०१ सुनिल सर्जेराव गंगावणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नेवासा पो.स्टे गु.र.नं.४८५/२०२६ भा. न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, वैभव कलुबर्मे शेवगाव विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनाप्रमाणे नेवासा पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक सागर ढिकले, पो. उपनिरीक्षक विकास पाटील, पोहेकॉ अजय साठे,सुनिल गंगावणे,नारायण डमाळे, सुमित करंजकर, अतुल शेळके, परमेश्वर गहाळ यांनी केली आहे. पुढील तपास सहायक फौजदार गणेश नागरगोजे हे करीत आहेत.

## मध्यरात्री अल्पवयीन मुलीचे अपहरण, गुन्हा दाखल !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अज्ञात इसमाने एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचे तीच्या राहत्या घरातून अपहरण करून पळवून नेल्याची घटना दि. ६ जून रोजी मध्यरात्रीच्या सुमारास राहुरी तालुक्यातील टाकळीमियॉ परिसरात घडली.

या घटनेतील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी दि. ६ जून २०२६ रोजी रात्री ९ वाजे दरम्यान जेवण करुन घरात झोपी गेली होती. रात्री १२ वाजे दरम्यान मुलीच्या आईला झोपेतुन जाग आली असता त्यांची मुलगी घरात नसल्याचे दिसून आले.

नातेवाईकांनी पिडीत मुलीचा आजूबाजूला व परिसरात शोध घेतला. मात्र ती कोठेही मिळुन आली नाही. तेव्हा नातेवाईकांची खात्री झाली कि, कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता मुलीला पळवुन नेले.

घटनेनंतर पिडीत मुलीच्या वडिलांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून अज्ञात इसमां विरुध्द गुन्हा रजि. नं. ६६५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. राहुरी पोलीस पथकाकडून पिडीत मुलीचा शोध सुरु आहे.

## अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने फ्लॅटमध्ये नेल्याचा आरोप; पोक्सो दाखल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : राहाता शहरातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला रस्त्यात अडवून जबरदस्तीने फ्लॅटमध्ये नेण्याचा आणि तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध राहाता पोलिस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरातील महिला व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ६ जून रोजी दुपारी सुमारे अडीच वाजता मैत्रिणीसह मेहंदीचे कोन खरेदी करण्यासाठी जात होती. त्यावेळी आरोपी हरीदास अर्जुन गायकवाड याने तिचा हात पकडून त्याच्या फ्लॅटमध्ये नेल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. मुलीने तेथून सुटका करून घेत घरी जाऊन कुटुंबीयांना घडलेला प्रकार सांगितला.

फिर्यादीनुसार, आरोपीने मुलीला धमकावल्यामुळे ती सुरुवातीला घाबरली होती. त्यानंतर कुटुंबीयांच्या मदतीने चार दिवसांनी राहाता पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीत आरोपीने मुलीशी गैरवर्तन केल्याचा तसेच प्रकाराची माहिती कोणाला दिल्यास तिच्या कुटुंबीयांना इजा करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे तसेच पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दीपक सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, माजी नगरसेविका सुनिता टाक यांनी पीडित कुटुंबाला धीर देत प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पोलिसांकडून प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून तपासानंतर पुढील वस्तुस्थिति स्पष्ट होणार आहे.

## अहिल्यानगरच्या ७ नेमबाजांची सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शहरातील खेळाडूंनी मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत पदकांची कमाई करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अहिल्यानगर सिटी रायफल ण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या तब्बल ७ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत सब नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे. या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात किर्ती चक्रवर्ती हिने कास्य पदक मिळवले. तसेच ५० मीटर ३ पोझीशन रायफल प्रकारात कार्तिक कोल्हे याने चौथ क्रमांक मिळवला. आयुष काळे, आदेश खर्डे, पार्थ शिंदे यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला. या खेळाडूची गोवा येथे होणाऱ्या सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली असून या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळेच खेळाडूंना हे यश मिळवता आले आहे. या यशाबद्दल खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, आ. संग्राम जगताप, खा. नीलेश लंके, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील विविध मान्यवरांनी खेळाडूंना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सोनईत कौतुकी नदी स्वच्छता मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी मंत्री शंकरराव गडाखांच्या पुढाकारातून जलसंवर्धनाला नवी दिशा



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई गावाची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या कौतुकी नदीच्या स्वच्छता, संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी यशवंत सामाजिक प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या विशेष मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नदीपात्रातील गाळ काढणे, काटेरी झुडपे हटविणे, प्लास्टिक व इतर कचऱ्याची विल्हेवाट लावणे आणि नदीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत करणे यासाठी मोठ्या प्रमाणावर श्रमदान करण्यात येत आहे. माजी जलसंधारण मंत्री शंकरराव गडाख यांच्या पुढाकारातून तसेच ज्येष्ठ साहित्यिक व माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त यशवंत सामाजिक प्रतिष्ठानने या अभियानाची जबाबदारी स्वीकारली. या कामासाठी प्रतिष्ठानमार्फत तब्बल १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

त्यामुळे कौतुकी नदीच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर स्वच्छता आणि गाळ काढण्याची कामे हाती घेण्यात आली असून नदीचे रुपडेच पालटले आहे. सोनईतील रामझिरा मंदिर परिसर, दशक्रिया विधी घाट, मारुती मंदिर परिसर, दरंदले अमरधाम परिसर, लांडेवाडी रोड परिसरातील दरंदले वस्ती आदी भागांमध्ये स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविण्यात आले.

ग्रामस्थ, युवक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत श्रमदानाद्वारे नदी संवर्धनात मोलाचे योगदान दिले. कौतुकी नदी ही सोनईच्या पर्यावरणीय, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. नदीपात्रातील गाळ काढल्याने आणि स्वच्छता केल्याने परिसरातील भूजल पातळीत वाढ झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच स्वच्छतेमुळे नदी परिसर अधिक आकर्षक, प्रदूषणमुक्त आणि पर्यावरणपूरक बनत असल्याचेही नागरिकांनी सांगितले.

युवा नेते उदयन गडाख यांनी यापूर्वी मारुती मंदिर येथे झालेल्या बैठकीत नागरिकांना नदीमध्ये कचरा टाकू नये, असे आवाहन केले होते. विशेषतः हॉटेल, व्यापारी प्रतिष्ठाने व इतर व्यावसायिकांनी नदी प्रदूषित होणार नाही याची काळजी घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या जलसंवर्धनविषयक धोरणातून यापूर्वीही नेवासा तालुक्यातील विविध गावांमध्ये नद्या व ओढ्यांवर बंधारे उभारण्यात आले आहेत.

या उपक्रमांमुळे तालुक्यात जलसाठ्यात वाढ होऊन जलसंवर्धनाची व्यापक चळवळ निर्माण झाली. परिणामी नेवासा तालुका 'सुजलाम सुफलाम' करण्याच्या दिशेने महत्त्वाची वाटचाल करत असल्याचे ग्रामस्थांचे मत आहेत. कौतुकी नदी स्वच्छता अभियानामुळे केवळ नदीचे सौंदर्य वाढत नसून पर्यावरण संरक्षण, जलसंवर्धन आणि सामाजिक सहभागाचे प्रभावी उदाहरणही निर्माण होत आहे. भविष्यातही ही मोहीम सातत्याने राबवून नदी परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

> **कचरा नदीत टाकू नका; घंटागाडीतच द्या**
>
> माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कौतुकी नदी स्वच्छता अभियान सुरू आहे. सोनई गावातील व्यावसायिक व नागरिकांनी आपला ओला व सुका कचरा कौतुकी नदीमध्ये टाकू नये. ग्रामपंचायतीच्या घंटागाडीतच कचरा देऊन या अभियानाला सहकार्य करावे.
>
> **सविता अंबादास राऊत, माजी उपसरपंच, ग्रामपंचायत सोनई( ता.नेवासा)**

## अट्टल घरफोडी करणारे दोघे एलसीबीने पकडले



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वांगी येथे घरफोडी करून चार लाखाचे दागदागिने रोकड चोरून नेणारे अट्टल गुन्हेगार दोन जणांना एलसीबीने पकडले असून त्याच्याकडून ६ लाख ९० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, वांगी येथील सोपान चंद्रभान थोरात (रा.वांगी, ता. श्रीरामपूर ) हे १६ मे रोजी घरापासून काही अंतरावर असणाऱ्या वस्तीवर सकाळी साधारणाता १० ते १२ वाजेच्या दरम्यान जेवण करण्यासाठी गेले होते.त्याचवेळीला अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घरांचे कुलूप तोडून ४ लाख ६ हजारांचे दागदागिने रोकड चोरून नेल्याची घटना घडली होती.याबाबत तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा सखोल तंत्रशुद्ध पद्धतीने पोलीसांनी तपास करत मिळालेल्या गुप्त माहितीदारांमार्फत सदरचे चोरी करणारे हे घोडेगाव ते शनिशिंगणापूर (ता. नेवासा ) येथे जाणाऱ्या रोडच्या असल्याची माहिती मिळाली असता, त्यावेळी पोलिसांना पाहातच ते पळू लागले.मात्र पोलिसांनी ताब्यात घेतले.त्यांची विचारपूस केली असता, स्वरूप उर्फ गुंड्या डिस्चार्ज काळे (वय ३० ) व दऱ्या पऱ्यांडा भोसले (वय ३५, रा.अंतापूर ता.गंगापूर जि.छत्रपती संभाजीनगर ), असे सागितले. आरोपीनी (दिघी ता.श्रीरामपूर) येथील चोरीची कबुली देत ५० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड व ४० हजारांची मोटारसायकल असा ६ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.